
म. ग्रं. सं. ठाणे
७७४६
REFBK-0008943



# पटाचारा

व

# इतर बुद्ध शिष्या

ग्रंथसंग्रहालय, ठाणे
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक ....................

REFBK-0008943

अहिल्या सामंत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

—एकमेव विक्रेते—

इनामदार बंधु

९११ सदाशिव पेठ, पुणे २.

# अनुक्रमणिका


| गोष्ट | | पृष्ठ |
|---|---|---|
| पटाचारा | .... | ७ |
| भद्दा कुंडलकेशा | .... | १५ |
| विशाखा मिगारमाता | .... | २२ |
| महाप्रजापती गौतमी | .... | २६ |
| क्षेमा | .... | ३३ |
| कृशा गौतमी | .... | ३८ |
| यशोधरा ( 'साधना' बुद्ध अंक १९५६ ) | | ४५ |


मुखपृष्ठ : चित्रकार पाथरकर.

...ग्रहालय ठाणे
अ. क्र. 8843

# पटाचारा
# व
# इतर बुद्ध शिष्या

## प्रस्तावना

गेल्या वर्षापासून बुद्धजयंतीची धामधूम साऱ्या देशांत सुरू आहे. लहान-मोठ्या संस्थांत गौतम बुद्धाबद्दल व्याख्यानें झालीं. अनेक व्यासपीठांवर प्रार्थना झाल्या. बहुतेक प्रमुख नियतकालिकांनीं या ना त्या प्रकारें खास अंक काढून बुद्धाचा गौरव करण्याचें श्रेय पदरांत पाडून घेतलें. पण उत्सवाचा हा ऐन भर वाङ्मयीन व सांस्कृतिक दृष्ट्या बराचसा वरवरचा होता. ज्यांना बुद्धाबद्दल धार्मिक कळवळा होता त्यांनीं केवळ भक्तिपूर्वक बुद्धाचें गुणगान केलें, आणि प्रसंगीं बौद्धेतर विचारसरणीवर कोरडे ओढण्याचें समाधान अनुभविलें. अभ्यासकाची व जिज्ञासूची भूमिका घेऊन बौद्ध वाङ्मयाचें परिशीलन करून त्याचा आपापल्या शक्तीप्रमाणें आढावा घेण्याचे परिश्रम मात्र फारच अल्प प्रमाणांत झाले. अशा अल्पसंख्याकांत अहिल्या सामंत यांची मी गणना करतें. त्यांची ही पुस्तिका विद्वत्ताप्रचुर नाहीं. जाणत्यांना तिच्यापासून कांहीं नवें शिकायला मिळायचें नाहीं. तरी पण ज्या वेळीं बुद्धकालीन स्त्रियांवर लिहिण्याचा प्रसंग प्राप्त झाला त्या वेळीं त्यांनीं ती वेळ 'मारून' नेली नाहीं, तर विद्यार्थिनीला भूषणावह अशा जिज्ञासेनें, परिश्रमांची कदर न करतां, बौद्ध वाङ्मयाचें आलोडन केलें. इंग्रजी व मराठींतलें बरेंच साहित्य त्यांनीं व्यवस्थितपणें वाचलें. त्यांतल्या ज्या व्यक्तिरेखा त्यांना विशेष उठावदार वाटल्या त्या त्यांनीं निवडल्या. या निवडींतच अभिरुचीचें दर्शन घडतें. स्वतःला ज्या विषयाची माहिती नाहीं असा विषय घेऊन त्याची शोधक बुद्धीनें तपासणी करायची ही प्रथा मला अनेक नवोदितांत अधिकाधिक

दिसून येते. मला ती स्वागताहें वाटते. एकाच विचारधारेला चिकटून बसण्यांत तरुण मनाची वृत्ति एकांगी बनते. भिन्न भिन्न धर्म, पंथ, समाजकारणें व राजकारणें यांची निःपक्षपातीपणें छाननी करण्याची आवड प्रगतीचें चिन्ह आहे; आणि म्हणूनच अहिल्या सामंत यांच्या या पहिल्याच कृतीचें मी स्वागत करतें. हिच्यामुळें त्यांना दुसऱ्या ज्ञानक्षेत्रांतहि विवेचक बुद्धीनें प्रवेश करून घेणें सुलभ होईल असें वाटतें.

या पुस्तिकेंत पटाचारा व इतर बुद्ध शिष्यांच्या कथा आहेत. या कथांच्या पार्श्वभूमि मनोरंजक आहेत. वेदांत घोषा व अपाला यांचीं सूक्तें आहेत. पण त्यांच्या करुण चरित्ररेखा फक्त 'बृहद्देवता' या ग्रंथांत सांपडतात. गार्गी व मैत्रेयी यांचीं चरित्रें अज्ञातच आहेत असें म्हणायला हरकत नाहीं. अनसूया व लोपामुद्रा यांचीं रम्य चरित्रेंहि महाभारतामुळेंच प्रसृत झालीं. सांगायचा उद्देश असा कीं, स्वतंत्र प्रतिभेच्या भारतीय स्त्रियांचीं चरित्रें मिळणें फार दुर्मिळ आहे. त्यांतल्या त्यांत आत्मचरित्रांची प्रथा तर भारतांत फारच दुर्मिळ! त्यांत स्त्रियांचीं आत्मचरित्रें! नांव कशाला! पण बौद्ध संघांत स्त्रियांना प्रवेश मिळाला आणि हें ओंगळ आत्मकथनाचें दालन बौद्ध भिक्षुणींनीं आपल्या साध्यासुध्या उद्गारांनीं, जीवनांतल्या अनुभवांनीं मंडित केलें. थेरीगाथांत जवळ जवळ पांचशें भिक्षुणींच्या गाथा आहेत. त्यांत काव्यगुण नाहींत, पण जीवनाशीं अतोनात प्रामाणिकपणा राखला आहे. ही आत्मकथनाची वाङ्मयीन शाखा भारतीय वाङ्मयांत अशीच वाढती राहाती तर......पण जें झालें नाहीं त्याबद्दल व्यर्थ दुःख कशाला करीत बसावें? जें आहे त्याचें पालन करावें, नाहीं तें रुजवावें आणि वाढीस लावावें, तरच समाधानाला कांहीं जागा राहील. मला या गाथा वाचून बरींच वर्षे झालीं. पण अजूनहि कांहीं उद्गार माझ्या मनांत जसेच्या तसेच ताजेपणानें वावरताहेत. आम्रपाली ही मूळची गणिका. त्या व्यवसायांत अनिच्छेनें पडलेली. त्या प्रवाहपतितेलाहि बौद्धसंघांत नवें चैतन्य मिळालें, गांभीर्य आलें. अत्यंत लावण्यवती अशी ही आम्रपाली आपल्या वृद्धावस्थेंत

असे उद्गार काढते की, "बरें झालें, मी शरीरसुखाच्या आसक्तींतून, सौंदर्याच्या अभिमानापासून वेळींच मुक्त झालें ती. तारुण्य ओसरलें नव्हतें तेव्हांच मीं ह्या मार्ग पत्करला म्हणून म्हातारपणांतलं कुरूपपण मला सोसतां येत आहे. माझे केस कसे काळेभोर कुरळे होते. फुलांचा सतत सुवास त्यांना येई. पण आतां तेच पिकून पांढरे झाले आहेत, खुरटले आहेत. सशाच्या केसांना येते तशीच घाण त्यांना येत आहे."

दुसरी एक स्त्री म्हणते, "मी दरिद्री होतें. इतकी कीं, खायला मिळणेंहि मुष्कील. जावें तिकडे दुःख आणि मानहानि! केवळ घांसभर खायला मिळावें म्हणून मी संघांत आलें. माझें दुःख गेलें. खायला मिळालें, वस्त्र मिळालें आणि मी जीवनाचा विचार करूं लागलें. हळूहळू माझे विचार रुंदावले. मला धर्माचा अर्थ उमगला. अनंत जन्मींचा ठेवा मला मिळाला. माझे विचार इतरांना शिकायला आवडतात. किती हें भाग्य?"

तिसरी एक थेरी म्हणते, "माझ्यां कपाळीं वैधव्य लिहिलेलें. एकामागून एक असे सात नवरे मीं केले आणि अखेर एकटीच राहिलें. केवळ वैतागानें मी संघांत आलें आणि त्यानंतर माझ्या मनांत परिवर्तन होऊं लागलें. वासनांच्या मागें पळण्याचें सुटलें; हांव संपली; शरीरसुखाचें वैयर्थ उमगलें; वृत्ति स्थिरावल्या; मुक्तीचा मार्ग मला मिळाला."

हे उद्गार आध्यात्मिकाच्या मागें लागलेल्या स्त्रियांचे असले तरी त्यांत एक विचार मोठा स्फूर्तिदायक आहे. अध्यात्म व भौतिकवाद हे निमित्तमात्र आहेत. महत्त्वाची गोष्ट अशी कीं, जें सत्य गौतम बुद्धासारख्या बुद्धिमान, शीलाचारसंपन्न पुरुषश्रेष्ठाला प्रतीत झालें, तेंच सत्य तितक्याच उत्कटपणें या सामान्य अशिक्षित स्त्रियांनींहि अनुभविलें. सामान्य जीवनाच्या कडा सोनेरी होणें ही घटना कोणत्याहि काळीं, कोणत्याहि अनुभवाच्या क्षेत्रांत स्फूर्तिप्रद असते; आदरणीय तर असतेच असते. आणि म्हणूनच पटाचारा काय किंवा इतर बुद्ध शिष्या काय, त्या कोणकोणत्या प्रसंगांतून गेल्या आणि त्यांनीं काय मिळविलें हें समजून घेणें मोठें मौजेचें आहे.

अहिल्या-सामंत यांनीं मार्मिकपणें, लहान-थोरांना आवडेल अशा सहज-मनोहर शैलींत कांहीं प्रमुख भिक्षुणींच्या चरित्ररेखा मांडल्या आहेत. पटाचारेची कथा मुळांतच हृदयंगम; तशीच कुंडलकेशेची. पण जिचें व्यक्तित्व अत्यंत शांत, नम्र व केवळ परप्रकाशी असें वरवर पाहिलें असतांना भासतें त्या यशोधरेची व्यथा, तिचें अंतःसौंदर्य या सर्व व्यक्तिरेखांत चांगलें साधलें आहे. वाचकांना या कथा आवडतील याबद्दल मला शंका वाटत नाहीं.

दुर्गा भागवत

मुद्रकः— सी. एच्. गांधी, हिंदुस्थान प्रिंटिंग प्रेस,
३५७-५८ नारायण पेठ, पुणें २.
प्रकाशिकाः— सौ. उषा जयराम नागपूरकर,
३४१ सदाशिव पेठ, पुणें २.

…टा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २९८९३ वि: …
क्रमांक …७७७४… नों: दि: २०/५/५०



# पटाचारा

**श्रा**वस्ति नगरांत एका अत्यंत श्रेष्ठ आणि श्रीमंत घराण्यांत पटाचारेचा जन्म झाला. अभिजात सौंदर्याच्या या प्रतिमेनें जेव्हां तारुण्याच्या प्रांतांत पदार्पण केलें तेव्हां किती तरी तरुण तिला आपली सहधर्मचारिणी करून घ्यायला तयार झाले. तिच्या पित्यानेंहि तिला वेळींच योग्य वर शोधून देण्याचें ठरविलें. वरसंशोधन करून पटाचारेच्या वडिलांनीं आपल्या तोलाचा आणि रूपगुणांनीं आपल्या कन्येला साजेसा एक वर तिच्यासाठीं निश्चित केला आणि लग्नाचा मुहूर्तहि ठरविला.

पटाचारेच्या वडिलांनीं तिचें लग्न ठरविलें खरें, पण जिचा जन्माचा जोडीदार त्यांनीं निवडला होता तिची या बाबतींत एका शब्दानेंहि संमति घेण्यांत आली नव्हती, कीं तिला कोणी कांहीं विचारलेंहि नव्हतें. मुलीचें

योग्य वराशीं लग्न ठरलें. ती आतां कायमची सुखी होईल या कल्पनेनें सारींजण आनंदून गेलीं होतीं. दुःखी होती एक पटाचारा!

पटाचारेचें मन तिच्या घरीं नोकरीला असणाऱ्या एका तरुणावर बसलें होतें. त्यालाच आपला जन्माचा जोडीदार म्हणून तिनें मनानें वरलें होतें. म्हणूनच आपल्या लग्नाची बातमी ऐकून ती दुःखी झाली. यांतून कांहीं तरी मार्ग काढणें आवश्यक होतें. पटाचारेनें आपल्या प्रियकराला आपली भेट घेण्याचा निरोप आणि भेटीचें संकेतस्थळहि कळविलें, आणि ठरलेल्या वेळीं ती एका कुंजांत जाऊन प्रियकराची वाट पहात बसली. इतक्यांत तिला पावलांची चाहूल लागली. आनंद, दुःख व भय अशा संमिश्र भावनांनीं तिचें मन अस्वस्थ झालें होतें. तिनें सारी हकीकत त्याला सांगितली आणि आतां आपण कोणता मार्ग काढावयाचा असा त्याला प्रश्न विचारला.

तो तरुणहि तिच्या लग्नाची गोष्ट ऐकून दुःखी झाला. त्याचें मस्तक सुन्न होऊन गेलें.

पटाचारा म्हणाली, "उद्यां रात्रीपर्यंत आपण कांहीं करायला मोकळें आहों. परवांपासून माझ्या लग्नाचा सोहळा सुरू होईल; मग मात्र तुझ्या नजरेस पडणेंहि मला अशक्य होईल, आणि परिस्थितीपुढें मान तुकवून नशिबीं आलें तें भोगायला तयार व्हावें लागेल." तो तरुण स्तब्ध राहिला. पटाचारेशीं लग्न करावयाचें म्हणजे तिला आपल्या दारिद्र्यांत भागीदार करायचें या कल्पनेनें त्याचें मन अस्वस्थ झालें. शेवटीं मनाचा धीर करून तो म्हणाला, "तुझ्यावर माझें किती प्रेम आहे तें आतां शब्दांनीं सांगायची गरज नाहीं. पण त्या प्रेमाच्या मोबदल्यांत तुला साऱ्या सुखांपासून दूर करून दारिद्र्याच्या खाईत लोटावयाची कल्पनाहि मला सहन होत नाहीं. तुझा दर्जा, तुझें रूप व तुझें ऐश्वर्य यांपैकीं कशामध्येंहि माझी व तुझी बरोबरी होणार नाहीं. मी तुझ्या घरचा एक यःकश्चित् नोकर! तूं भावनेच्या आहारीं जाऊन दुःखी व्हावेंस हें मला रुचणार नाहीं. माझ्या स्वार्थासाठीं मी तुला जन्माची दुःखी करूं इच्छित नाहीं."

आपल्या प्रियकराचें हें बोलणें ऐकून पटाचारेला त्याच्या प्रेमाची थोरवी पटली, आणि त्याबरोबरच त्याच्या दुबळेपणाचा थोडासा रागहि आला. ती म्हणाली, "तुझ्या प्रेमासाठीं, सहवासासाठीं मी साऱ्या वैभवाचा त्याग करावयाला तयार आहें. तुझ्याशिवाय या वैभवांतहि मी दुःखीच राहीन; तुझ्याबरोबर मी दारिद्र्यांतहि सुखीच होईन. आपण आज रात्रींच येथून पळून कोठें तरी दूर निघून जाऊं या. तुझें आणि माझें एक नवें विश्व निर्मू या. त्यांतच मी सुखी होईन." त्या तरुणानें तिची आणखीहि समजूत घालून तिचें मन वळविण्याचा प्रयत्न केला, पण ती कोणतीच गोष्ट मान्य करायला तयार नाहीं. तिचें आपल्यावर एकनिष्ठ प्रेम आहे याची संपूर्ण खात्री पटल्यावर त्यानें तिच्या बेताला संमति दिली. ठरल्याप्रमाणें कोणालाहि आपल्या बेताची चाहूल लागू न देतां पटाचारा आपल्या प्रियकरासमवेत घराबाहेर पडली.

सबंध रात्र प्रवास करून जमेल तितकी मजल मारून तीं दोघें एका खेडे-गांवांत आलीं. तेथें एका मंदिरांत जाऊन त्यांनीं आपलें लग्न लावून घेतलें व एक झोपडी बांधून त्यांत आपला संसार थाटला.

नव्या संसारांत दोघेंहि रंगून गेलीं होतीं. कांहीं दिवसांनीं पटाचारा माता होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. दोघांनाहि अत्यंत आनंद झाला. पण...

आतां एक मोठा प्रश्न होता कीं, प्रसूतीच्या वेळीं आणि नंतर मदती-साठीं कोणाला बोलवावें ? पटाचारेचे प्रसूतीचे दिवस जसजसे जवळ येऊं लागले तसतसें तिला आपण माहेरीं जावें, आपल्या आईवडिलांना भेटावें असें वाटूं लागलें. तिनें आपली इच्छा पतीला कळविली तेव्हां तो म्हणाला, "तुला माहेरीं जावेंसें वाटतें खरें, पण ज्यांच्या प्रतिष्ठेला तूं लग्न ठरलें असतांहि प्रियकराबरोबर पळून जाऊन धक्का लाविला आहेस अशीं तीं माणसें तुला जवळ घेणार नाहींत. तुला ते हांकलून लावतील व तुझा अपमान करतील. त्यापेक्षां तूं त्यांच्याकडे न जाणेंच चांगलें." नवऱ्याचें हें बोलणें

पटाचारेला रुचलें नाहीं. आपला पति आपलें ऐकत नाहीं असें पाहून पटाचारेनें एके दिवशीं तो कांहीं कामाला बाहेर गेला असतां हळूच घरांतून बाहेर पडून माहेरची वाट धरली. इकडे नवरा घरीं येऊन पहातो तों पटाचारा नाहींशी झालेली ! ती माहेरीं निघून गेली असावी अशी त्याला शंका आली म्हणून तो तिच्या शोधासाठीं तिच्या माहेरच्या दिशेनें निघाला. अखेर त्या दोघांची रस्त्यांत गांठ पडली. चालण्याच्या श्रमांनीं पटाचारा थकून गेली होती. तिला एकदम प्रसूतिवेदना सुरू झाल्या. तिच्या पतीनें कसेंबसें तिला शेजारच्या खेड्यांतील एका घरीं नेलें. तेथें ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. पटाचारेला आणि नूतन अर्भकाला घेऊन तिचा पति आपल्या घरीं परतला. नव्या बाळाच्या सेवेंत पटाचारा आपल्या माहेरीं जाण्याचा विचार विसरून गेली. अशीं तीन वर्षें लोटलीं, आणि पुन्हा पटाचारा माता होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. तिला आतांहि माहेरीं जाण्याची उत्कट ओढ लागली. तिनें आपला विचार पतीला सांगितला. अर्थात्, त्याची संमति मिळणें शक्यच नव्हतें. तेव्हां एकदां पति बाहेर गेला असतां मुलाला घेऊन पटाचारा माहेरच्या दिशेनें निघाली. पति घरीं येऊन पाहातो तों पटाचारा आणि मुलगा घरीं नाहींत. त्यानें ती माहेरीं जाण्यास निघाली असावी असा तर्क केला आणि तो तिच्या शोधार्थ निघाला. पटाचारा बरीच दूर गेली होती. वाटेंत तिला एक अरण्य लागलें. पण तिचा पतीहि आतां त्या अरण्यांत येऊन पोहोंचला होता. त्यांची गांठ पडली आणि तीं पुढें चालूं लागलीं.

ते पावसाळ्याचे दिवस होते. सूर्य ढगाआड अदृश्य झाला होता. वादळाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. आसऱ्यासाठीं तीं आडोसा शोधूं लागलीं. सुदैवानें त्यांना तेथें एक उध्वस्त स्थितींतील झोंपडी दिसली. पटाचारेनें आणि तिच्या पतीनें त्या झोंपडीचा आसरा घेतला. आणि आंत पाणी येऊं नये म्हणून जवळच्या फांद्या तोडून त्यावर घालण्यासाठीं फांद्या आणायला

पटाचारेचा पति बाहेर पडला. पटाचारा मुलासह झोपडींत होती. इतक्यांत एकाएकीं जोराचा पाऊस व वादळ यांना सुरवात झाली. विजेचा गडगडाट होऊं लागला. पटाचारेला मानसिक व शारीरिक श्रम होऊं लागले. तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. पटाचारा अगदींच अगतिक होऊन गेली व पतीच्या येण्याची वाट पाहूं लागली. तो येण्याला जसजसा विलंब होऊं लागला तसतसें तिचें मन अधिकाधिक व्याकूळ होऊं लागलें. पतीचें न ऐकतां आपण घराबाहेर पडलों आणि अशा संकटांत येऊन पडलों म्हणून आपल्यावर रागावून तो आपल्याला टाकून तर जाणार नाहीं ना, अशीहि एक शंका तिच्या मनाला चाटून गेली. या अन्यमनस्क अवस्थेंत तिच्या प्रसूतिवेदना अधिकच वाढल्या आणि तिनें एका अर्भकाला जन्म दिला. शारीरिक आणि मानसिक दुःखानें पटाचारा अगदीं अगतिक होऊन गेली होती. आतां हळूहळू ती भयाण रात्र संपत होती. दिवस उजाडतांच पतीच्या शोधासाठीं बाहेर पडण्याचें तिनें ठरविलें. सकाळ झाल्याबरोबर स्वतःला कसेंबसें सांवरून, एका मुलाला छातीशीं कवटाळून व दुसऱ्याला हातीं धरून पटाचारा झोपडीबाहेर पडली. कांहीं पावलें चालून गेल्यावर तिच्या पायाला कसलातरी गार स्पर्श झाला. तिनें खालीं वांकून पाहिलें. तों... ! तिच्या मृत पतीचें शरीर काळेंनिळें पडलेलें, शरीर अस्ताव्यस्त होऊन पडलेलें तिला दिसलें. झाडाच्या फांद्या तोडतांना कृष्णसर्पाच्या दंशानें तो गतप्राण झाला होता. तें भयंकर दृश्य पाहून पटाचारेच्या डोळ्यांपुढें क्षणभर काजवे चमकले. तिनें पतीच्या मृत्यूबद्दल स्वतःला दोष लावून घेतला. आपल्या पतीच्या मृत्यूला पर्यायानें आपणच कारणीभूत झालों याची जाणीव तिला अधिकाधिक दुःखी करीत होती. पण असें दुःख करीत किती वेळ बसणार ? एकटी असती तर स्वतःच्या जिवाचें कांहीं बरेंवाईट करून घ्यायला ती मोकळी असती; पण आतां दोन अजाण जीव तिच्याबरोबर होते. त्यांच्या सुखासाठीं तरी माहेरचा आश्रय घेणें आवश्यक होतें. ती माहेरच्या दिशेनें निघाली.

चालत चालत पटाचारा एका नदीच्या किनारीं आली. दोन मुलांना घेऊन नदी ओलांडून जाणें तिला शक्य नव्हतें. म्हणून थोरल्या मुलाला नदीच्या ऐलतीरावर उभा करून धाकट्याला घेऊन ती नदी उतरून पलीकडे गेली. तेथें एका झाडाखालीं थोडीशी जागा साफ करून तिनें आपल्या धाकट्या मुलाला ठेवलें आणि दुसऱ्याला आणण्यासाठीं ती नदींत उतरली. ती नदीच्या मध्यावर जाते न जाते तोंच तिनें धाकट्या बाळाला ज्या झाडाखालीं ठेवलें होतें त्या झाडावर एक श्येनपक्षी बसला होता तो खालीं उतरला, आणि त्या अर्भकाला पटकन् तोंडांत घेऊन उडून जाऊं लागला. पटाचारेनें पक्ष्याला हाकारण्यासाठीं आपले हात उंच करून हवेंत हालविले. इकडे दुसऱ्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या मोठ्या मुलाला वाटलें कीं, आई हात वर करून बोलावीत आहे. म्हणून तो दुडदुडत पाण्यांत उतरला आणि नेमका एका भोवऱ्यांत सांपडून प्रवाहाला लागला. पतिनिधनानंतर काळानें लगेच तिच्या दोनहि पुत्रांचें अपहरण केलें. संवेदनाशून्य अशा अवस्थेंत ती नदींतून बाहेर पडली. तिच्या मनावर झालेल्या दारुण आघातानें जणूं तिची संज्ञा नाहींशीच झाली होती. मात्र एकच गोष्ट ती विसरूं शकली नाहीं. ती म्हणजे माहेरीं जाऊन एकदां आईच्या कुशींत विसावण्याची ! तिनें पुन्हा माहेरचा मार्ग धरला. कपड्यालत्त्याची शुद्ध नाहीं अशा अवस्थेंत ती आपल्या माहेरच्या गांवीं आली. तिला हळूहळू आपल्या ओळखीच्या खुणा पटूं लागल्या. आपल्या घराचा शोध करीत ती गांवांत हिंडूं लागली. शेवटीं एका वाटसरूला तिनें आपल्या वडिलांचें घर कोठें आहे म्हणून विचारलें. तिचा प्रश्न ऐकून तो मनुष्य खिन्न झाला आणि म्हणाला, "दुर्दैवी मुली ! नुकतीच कांहीं दिवसांपूर्वी त्या वाड्याला आग लागून त्या घरांतील सगळीं माणसें एका चितेवर जळून खाक झालीं !" ही हकीकत ऐकून पटाचारेच्या दुःखाची परिसीमा झाली. तिचें वेड वाढलें आणि अंगावरच्या वस्त्रांच्या चिंध्या करीत "दोन्ही पुत्र ते मृत झाले ! मार्गीं माझा पति मेला । आईबाप मम ते

बंधू । एक चितेवर जळती ॥ ” असें गाणें म्हणत ती रस्त्यांतून अर्धनग्न स्थितींत हिंडूं लागली. अशीच हिंडत हिंडत एकदां ती गौतमबुद्धाच्या विहाराकडे आली ! तेथें गौतमबुद्ध आपल्या शिष्यांना उपदेश करीत होते. पटाचारा वेडगाणें गातगात तेथें जाऊन उभी राहिली. तिनें बुद्धाचे शब्द ऐकले : “ मृत्यु हा नित्य आहे. कोणी कोणाचें नाहीं. माणसानें स्वतःच्या मुक्तीचा मार्ग शोधून काढला पाहिजे. ” इत्यादि अमृतमय शब्द कानीं पडतांच ती शुद्धीवर आली. आपल्या अर्धनग्न स्थितीची तिला लज्जा वाटली. लज्जेनें तिनें आपलें मुख दोन्ही हातांनीं झांकून घेतलें. इतक्यांत बसलेल्या एका भिक्षूनें तिच्या अंगावर वस्त्र फेंकलें. तिनें तें सर्वांगाभोंवतीं लपेटून घेतलें. बुद्धांनीं तिला बोलावून घेऊन तिची चौकशी केली. तिचें सांत्वन केलें. तिचें वेड त्यांच्या उपदेशानें नाहींसें झालें. नंतर तिनें भिक्षुणी होऊन बौद्धधर्माचा प्रचार केला.





# भद्रा कुंडलकेशा

भद्रा कुंडलकेशा ही एक राजाची मुलगी होती. भद्रा ज्या दिवशीं जन्मली त्याच दिवशीं राजपुरोहितालाहि एक मुलगा झाला. हा मुलगा जन्मल्याबरोबर राजधानींतील सर्व शस्त्रास्त्रें, आयुधें एकदम प्रज्वलित झालीं, चकाकूं लागलीं. सारे लोक चकित झाले. राजा तर हा चमत्कार पाहून एकदम घाबरूनच गेला. त्यानें तात्बडतोब पुरोहिताला बोलावणें पाठविलें. राजाज्ञा ऐकतांच पुरोहित लगबगीनें राजासमोर येऊन उभा राहिला. राजानें सांगितलेली हकीकत ऐकून घेऊन तो म्हणाला, "महा-राज, केवळ आपल्या राजवाड्यांतीलच शस्त्रास्त्रें प्रज्वलित झालीं असें नाहीं, तर नगरांत सर्वत्र हा प्रकार घडला आहे, आणि सारेच जण आश्चर्य व्यक्त करीत आहेत." पुरोहित एक क्षणभर स्तब्ध राहिला आणि म्हणाला, "माझ्या घरीं काल एक मुलगा जन्माला आला आहे. तो सर्वांचाच प्रबल शत्रु होणार आहे

—आणि त्याचें हें पूर्वचिन्ह आहे. पण महाराज, त्यामुळें घाबरून जाण्याचें कांहींच कारण नाहीं. या मुलाकडून महाराजांच्या जिवाला प्रत्यक्ष असा धोका मुळींच नाही. इतकेंच नव्हे तर, आपली इच्छा असल्यास या मुलाला कोठें तरी दूर पाठवायला मी सदैव तयार आहें."

पुरोहिताचें हें नम्र बोलणें ऐकून राजाचें मन शांत झालें. आपणाला या मुलापासून बाधा नाहीं असें पाहून राजानेंहि त्या मुलाला घरीं ठेवून घेण्यास पुरोहिताला आनंदानें संमति दिली.

पुरोहितानें मुलाचें नांव शत्रुक असें ठेविलें. 'मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात' असें म्हणतात. शत्रुकाच्या बाबतींतहि असेंच घडलें. तो बालपणापासूनच चोऱ्या करूं लागला. बापानें त्याला चोरीपासून परावृत्त करण्यासाठीं अनेक प्रयत्न केले पण व्यर्थ. चोरी करण्याचें जणूं त्याला व्यसनच लागलें होतें. शेवटीं मुलगा अगदींच हाताबाहेर गेला आहे असें पाहून नाइलाजानें त्याच्या वडिलांनीं त्याला काळीं वस्त्रें आणि कांहीं शस्त्रें देऊन हांकलून लाविलें.

असेच कांहीं दिवस गेले. नित्याप्रमाणें एकदां राजा नगरसंचाराला निघाला. फिरतांफिरतां त्याच्या लक्षांत आलें कीं, नगरांतल्या प्रत्येक घराला एक विशिष्ट प्रकारचें भोंक पडलें आहे. त्यानें सारथ्याला विचारलें, "प्रत्येक घराला हीं भोकें कां पाडलीं आहेत?"

सारथी म्हणाला, "महाराज, हीं भोकें प्रजाजनांनीं पाडलेलीं नाहींत. नगरांत शत्रुक नांवाचा एक चोर आहे, त्यानें हीं भोकें पाडलीं आहेत." राजानें हें ऐकून कोतवालाकडे शत्रुकाची चौकशी केली, व त्याला ताबडतोब पकडण्याचा हुकूम दिला. इतकेंच नव्हे, तर जर त्यानें शत्रुकाला ताबडतोब पकडलें नाहीं तर त्यालाच फांसावर लटकाविलें जाईल अशी त्याला तंबीहि दिली.

राजाच्या सांगण्याबरहुकूम तावडतोब शत्रुकाला पकडून राजापुढें हजर केलें. राजानें त्याच्या अपराधाची चौकशी केली व 'आरोपीची शहरांतून धिंड काढून नंतर त्याला फांशीं देण्यांत यावें' असा हुकूम दिला.

राजाच्या आज्ञेप्रमाणें शत्रुकाची गांवांतून धिंड निघाली. शत्रुकाची फजिती पाहायला बरींच मंडळी गोळा झालीं होतीं. राजकन्या भद्राहि आपल्या परिवारासह राजवाड्यांतील गच्चीवर उभी राहून हें दृश्य पाहात होती.

भद्रेच्या नजरेच्या टप्प्यांत तें दृश्य आलें. इतक्यांत तिची शोधक नजर शत्रुकावर खिळली. त्या तरुणाकडे तिचें मन आकर्षिलें गेलें. तो तरुण आतां फांसावर जाईल या कल्पनेनेंच ती शहारून गेली, आणि अगतिकपणें धाडकन् आपल्या मंचकावर जाऊन पडली. झालें; राजकन्येची प्रकृति बिघडली. महालांत सर्वत्र एकच गडबड उडाली. हें वृत्त राजाला कळल्याबरोबर तो आपल्या लाडक्या मुलीला भेटावला धांवून आला. राजानें तिला 'काय होतें' म्हणून अत्यंत प्रेमळपणें विचारलें; पण कांहींहि उत्तर न देतां ती निःस्तब्धपणें अश्रु गाळीत मंचकावर तशीच पडून राहिली. राजाला कांहींच समजेना. शेवटीं त्यानें तिच्या सख्यांकडे चौकशी केली. त्यांनीं राजकन्येच्या मनाची व्यथा राजाच्या कानावर घातली. राजा विचारांत पडला. आपली लाडकी मुलगी ज्या तरुणावर भाळली आहे तो आपला आणि राज्याचा शत्रु आहे; त्याला सोडावें तर लोकापवाद सहन करावा लागेल व आपल्या न्यायप्रियतेला डाग लागेल; आणि न सोडावें तर एकुलत्या एक लाडक्या मुलीच्या मृत्यूचा दारुण प्रसंग पाहावा लागेल. अशी परिस्थिति पाहून त्याच्या मनांत विचारांचें काहूर उठलें. उलटसुलट विचार त्याच्या मनांत सुरू झाले. कर्तव्य आणि प्रेम यांचा झगडा सुरू झाला. अखेर ह्या झगड्यांत प्रेमाचा विजय झाला. राजानें मनाशीं निर्णय घेऊन कोतवालाला गुप्तपणें कळविलें कीं, त्यानें शत्रुकाला मुक्त करून राजवाड्यांत आणावें व त्याच्याऐवजीं दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या एखाद्या गुन्हेगाराला फांशीं द्यावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२९६९३ वि: ...
क्रमांक ...४८ नोंः दि: २०।५।५६



कोतवालानें राजाच्या सांगण्याप्रमाणें केलें. शत्रुकाला राजवाड्यांत आणल्यावर त्याला स्वच्छ स्नान घालण्यांत आलें, व चांगला पोशाख देऊन भद्रेच्या महालांत पोहोंचविण्यांत आलें.

भद्रेची इच्छा पूर्ण झाली होती. तिनें मनानें वरलेला तिचा प्रियकर तिला प्राप्त झाला होता. कांहीं घटकांनीं फांसावर लटकावला जाणारा तो मनुष्य राजकन्येचा प्रियकर म्हणून तिच्या महालांत आला होता.

पण तो अभिजात दरोडेखोर होता. त्याचें मन भद्राच्या सौंदर्यानें किंवा राजवाड्यांतील सुखोपभोगांनीं मोहित झालें नाहीं. या बंधनांत तो स्वतःला अडकवून घेऊं इच्छीत नव्हता. तो कसल्या तरी विचारांत गढून गेला होता. इतक्यांत राजकन्या भद्रा नटून थटून, हातांत फराळाचें तबक घेऊन शत्रुकाकडे आली. शत्रुकानें तिला पाहिलें आणि तो म्हणाला, " मला तुला कांहीं सांगावयाचें आहे. "

इच्छातृप्तीनें भारावलेली भद्रा नम्रपणें म्हणाली, " आर्य, सांगावं. मी ऐकतें आहें. "

शत्रुक तिला म्हणाला, " हें पाहा, तुझ्यामुळें मी आज वांचलों असें जर तुला वाटत असेल तर ती चुकीची समजूत आहे. कारण, ज्या वेळीं मला पकडण्यांत आलें त्यावेळीं येथून जवळच असलेल्या एका कड्यावरील देवतेला मीं नवस केला होता. आजपर्यंत माझे सर्व मनोरथ तिच्याच कृपेनें पुरे झाले आहेत. मी आज जो जिवंत राहिलों आहें तोहि तिच्याच कृपेनें. तेव्हां आपण विवाह करण्यापूर्वीं प्रथम माझा नवस पुरा करूं. तूंहि माझ्याबरोबर चलावेंस अशी माझी इच्छा आहे. " भद्रेनें त्याच्या सांगण्याप्रमाणें नवस फेडण्याची सर्व सिद्धता केली आणि अंगावर बहुमोल अलंकार व वस्त्रें परिधान करून सर्व लवाजम्यासह ती कड्यावर जायला निघाली. कड्याच्या पायथ्याशीं आल्यावर शत्रुक म्हणाला, "एवढ्या डामडौलानें दासदासी-शिपाई-प्यादे घेऊन देवीच्या दर्शनाला जाणें मला योग्य वाटत नाहीं. तेव्हां तूं यांना मागें परतावयाला सांग. तूं आणि मी दोघेच जाऊन देवीचा नवस फेडूं. "

१२ दा. क्र. ... शाखा (स्थळप्रत)

शत्रुकाचें सांगणें भद्देला योग्य वाटलें. तिनें आपल्या लवाजम्याला परत फिरण्याची आज्ञा केली आणि ती शत्रुकाबरोबर कड्यावर जायला निघाली. तीं दोघें ज्या कड्यावर गेलीं तो कडा अगदीं निमुळता होता. दुसऱ्या बाजूला एक खोल दरी होती. कड्याच्या टोकावर जातांच शत्रुक एकदम भद्देला म्हणाला, " आतां तुझ्या अंगावरील वस्त्राखेरीज करून जे कांहीं दागदागिने असतील ते निमूटपणें काढून इथें ठेव. " भद्देचा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसेना ! पण त्याच्या शब्दांनीं तिची प्रणयाची धुंदी मात्र खाडकन् उतरली. ज्या पुरुषाला आपण मृत्यूच्या सीमेवरून परत आणलें, ज्याला आपलें सर्वस्व अर्पण केलें, त्यानें आपला मूळ स्वभाव अशा रीतीनें अचानकपणें प्रकट करावा याचा तिला अचंबा वाटला.

भद्देच्या जागीं दुसरी एखादी स्त्री असती तर ती असल्या कृतघ्नतेनें रागावून जाऊन नाहीं नाहीं तें टाकून बोलली असती, संतापानें वेडी झाली असती. पण भद्दा शहाणी होती, विचारी होती. ती स्त्रीसुलभ स्वभावानें म्हणाली, " स्वामी, या दासीकडून काय अपराध घडला ? " पण या नाजूक व कोमल प्रश्नाचा शत्रुकावर कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट, अत्यंत विकट हास्य करून तो म्हणाला, " वेडे पोरी, मी येथें नवस फेडायला आलो आहे हें तुला खरें वाटलें कीं काय ? " नवस करणें तर सोडच, पण या देवतेचें काळीज काढून खायलासुद्धां मी मागेंपुढें पाहाणार नाहीं. नवसाचें निमित्त पुढें करून तुझ्या दागिन्यांचें अपहरण करण्यासाठीं मी तुला येथें घेऊन आलों आहें. "

" पण महाराज ! मी स्वत: आणि पर्यायानें हे दागिने आपलेच नाहींत काय ? " मोठ्या काकुळतीच्या स्वरांत भद्देनें प्रश्न केला. " तें कांहीं मी जाणत नाहीं ! " तो कठोरपणें म्हणाला, " तुझी चीजवस्त निराळी, माझी निराळी. मी तुझी चीजवस्त लुटणार एवढेंच मला माहीत. " शत्रुकाचें हें बोलणें ऐकून तो कोणत्या प्रकारचा माणूस आहे हें भद्देच्या लक्षांत

आलें. याच्याशीं वादविवाद करण्यांत, त्याची सरळपणें समजूत घालण्यांत कांहीं हंशील नाहीं, असा तिनें विचार केला. आतां तिच्या कोमल व प्रणयी अंत:करणावर वज्राघात होऊन तिचें अलोट प्रेम एकदम आटून गेलें. तिचें कोमल हृदय एकदम वज्रासारखें कठोर बनलें. प्रसंगानें ती जिवावर उदार झाली आणि मनाशीं कांहीं तरी निश्चय करून शत्रुकाला म्हणाली, " प्राण-नाथ, आपली इच्छा पूर्ण करणें हेंच माझें कर्तव्य. तें मी पार पाडावयाला तयार आहें. पण तत्पूर्वी दासीची एकच इच्छा आहे ती आपण दयाळू अंत:करणानें मान्य कराल काय ? "

शत्रुक धनलोभानें अंध झाला होता. त्याची धूर्तता त्या एकाच विचा-रानें लुप्तप्राय झाली होती. तो विवेकभ्रष्ट झाला होता. तो भद्देला म्हणाला, " बोल, तुझी काय इच्छा असेल ती लवकर बोल ! "

भद्दा म्हणाली, " अलंकारांनीं सुशोभित केलेल्या या माझ्या शरिराला आपण एकदांच प्रेमानें आलिंगन द्यावें. "

शत्रुकाला तिची ही इच्छा अगदींच सामान्य व साधी वाटली. तो उता-वीळपणें म्हणाला, " चल, आटप लवकर. " आणि आलिंगन देण्यासाठीं तो तिच्यापुढें येऊन उभा राहिला. पर्वताच्या कड्यावर तीं उभी होतीं. खालीं भयाण दरी काळजबडा पसरून बसली होती. शत्रुक भद्देला आलिं-गन देण्यासाठीं पुढें आला, तीहि पुढें झाली, आणि दुसऱ्याच क्षणीं... आलिंगनाच्या बेहोषींत, तो बेसावध असतांना भद्देनें आपलें सारें बळ एक-वटून मोठ्या धैर्यानें शत्रुकाला खालीं दरींत ढकलून दिलें.

पर्वतस्थ देवतेनें भद्देचें हें विलक्षण हुषारीचें कृत्य पाहून तिची स्तुति करण्याच्या हेतूनें दोन गाथा म्हटल्या. त्यांचा अर्थ असा:—

( १ ) सर्वच ठिकाणीं पुरुष शहाणे दिसून येत नाहींत, तर निरनिराळ्या ठिकाणीं स्त्रीसुद्धां विलक्षण शहाणी ठरते !

( २ ) सर्वच ठिकाणीं पुरुष पंडित असतोच असें नाहीं, तर मुहूर्तभर विचार करून स्त्रीहि पंडिता होऊं शकते.

कांहीं वेळानें भद्दा भानावर आली. तिनें सर्व परिस्थितीचा अंदाज घेतला आणि अशा परिस्थितींत घरीं परतणें योग्य नव्हे असा निर्णय घेऊन प्रव्रज्या ( संन्यास ) घेण्यासाठीं निर्गंथांच्या आरामांत जायचें तिनें ठरविलें.

भद्दा कड्यावरून उतरून निर्गंथांच्या आरामाचा शोध करीत करीत आरामाधिपतींकडे येऊन पोहोंचली. त्यांना वंदन करून ती म्हणाली, " महाराज, मी प्रव्रज्या घेण्यासाठीं सर्वसंगपरित्याग करून आलें आहें. मला प्रव्रज्या देण्याची कृपा करावी."

आरामाधिपति म्हणाले, " भगिनी, प्रव्रज्या देण्यास माझी तयारी आहे. तुला कोणत्या विधीनें प्रव्रज्या घेण्याची इच्छा आहे ? "

" जी पद्धत अत्यंत कठीण अतएव श्रेष्ठ असेल, तिचा अवलंब करून मी प्रव्रज्या घेऊं इच्छितें."

" ठीक आहे," असें म्हणून आरामाधिपतींनीं तालपर्णाच्या चिमट्यानें तिच्या केसांचें लोचन करून ( केंस उपटून ) तिला प्रव्रज्या दिली. पुन्हा कांहीं दिवसांनीं जेव्हां तिचे केंस वाढले तेव्हां ते कुंडलासारखे वर्तुळाकार झाले. या तिच्या केसांवरून तिला भद्दा कुंडलकेशा असें नांव पडलें.


भद्दा प्रव्रज्या घेऊन आरामांत राहून जैनधर्माचा अभ्यास करूं लागली. कुशाग्र बुद्धीमुळें ती सर्व विद्यांत पारंगत झाली. नंतर अन्य गांवांत जाऊन जिथें जिथें विद्वान् लोक सांपडतील तिथें तिथें त्यांच्याकडे जाऊन तिनें विद्या शिकून घेतली. याचा परिणाम असा झाला कीं, तिच्यापुढें वादांत कोणीहि टिकेना. तिला आपल्या सामर्थ्याची खात्री पटल्यावर ती वादविवाद करून जयपत्र मिळविण्यासाठीं मोठमोठीं गांवें व शहरें हिंडूं लागली. तिची वाद-विवादाला आवाहन करण्याची पद्धत अभिनव होती. ती ज्या गांवांत जाई त्याच्या सीमेवर एक जंबुवृक्षाची फांदी लावी. जो वाद करण्यास समर्थ असेल त्यानें ती उपटून टाकावी व तिच्याशीं वादविवाद करावा. भद्दा विद्येच्या मदानें उन्मत्त होऊन गेली होती.

ती फिरतफिरत एकदां श्रावस्ती नगरांत आली. या नगरांतच भगवान् बुद्ध आपल्या भिक्षूंसमवेत उतरले होते. बुद्धांचा भिक्षु सारिपुत्त यानें तिचें आवाहन स्वीकारलें. भद्देनें वादविवादाची तयारी केली. ह्या माणसाला आपण जिंकणार असा तिला दांडगा विश्वास होता. म्हणून तिनें आपण सर्वांसमक्ष याची फजिती करावी या हेतूनें सर्व गांवाला आपला वादविवाद ऐकायला येण्याचें निमंत्रण दिलें.

ठरल्याप्रमाणें सभेला सुरुवात झाली. ८०,००० माणसांनीं तो सभा-मंडप फुलून गेला होता. वादाला सुरुवात झाली. भद्देनें सारिपुत्ताला जे जे प्रश्न विचारले त्या त्या प्रश्नांचें त्यानें समाधानकारक उत्तर दिलें. आतां प्रश्न विचारण्याचा मान सारिपुत्ताचा होता. त्यानें भद्देला प्रश्न विचारला, "एक म्हणजे काय?"

भद्देला उत्तर देतां येईना.

(एकमेवाद्वितीयम् । एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति—उपनिषद्. एकं नाम किं? किंवा सब्बे सत्ता आहाराहित्तिका) म्हणजे, परमेश्वर एक आहे, किंवा आहारावर सर्व प्राणी जगतात. तेव्हां आहार हा समानधर्म आहे अशा उत्तराची त्याला अपेक्षा असावी. भद्देनें "मला ठाऊक नाहीं" असें प्रत्युत्तर दिलें. ती सारिपुत्ताला शरण गेली. तिनें शेवटीं बुद्धांचा आश्रय घेतला आणि ५० वर्षें अविश्रांत धर्मप्रचार करीत राहिली.





# विशाखा मिगारमाता

साकेत नांवाच्या शहरांत धनंजयश्रेष्ठी नांवाच्या एका श्रीमंताच्या पोटीं विशाखा मिगारमाता जन्माला आली. हें शहर तिच्याच वडिलांनीं वसविलें होतें. त्यामुळें नवकोट नारायणामध्यें त्यांची गणना होत असे. विशाखा अत्यंत रूपवान, तशीच गुणवान आणि चतुरहि होती. रूप आणि सद्‌गुण यांचा समन्वय, म्हणजे सुवर्णाला सुगंध अशांतलाच प्रकार ! विशाखेनें जेव्हां तारुण्याच्या उंबरठ्यावर पाऊल टाकलें तेव्हां तिच्या वडिलांनीं साकेतापासून थोड्याच अंतरावर असलेल्या श्रावस्तीमधील मिगारश्रेष्ठीच्या पूर्णधन नांवाच्या पुत्राशीं तिचा विवाह ठरविला.

मिगारश्रेष्ठी आणि धनंजयश्रेष्ठी हे दोघेहि तोडीचे व्याही झाले ! विशाखा आणि पूर्णधन यांचा विवाहसोहळा मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला.

विवाहविधि संपून विशाखा जेव्हां सासरीं श्रावस्तीला जावयाला निघाली तेव्हां धनंजयश्रेष्ठीनें आपल्या जातींतील आठ कुलीन गृहस्थांना बोलावून आणिलें आणि त्याह्यांना विनंति केली कीं, माझी मुलगी आजपासून सून म्हणून तुमच्या घरीं नांदायला येत आहे. गृहिणीपदाला उपयोगी असणारें योग्य तें शिक्षण आम्हीं तिला दिलें आहे. पण जर कां तिच्या हातून एखादी चूक घडली, तिच्यांत कांहीं दोष आढळला, तर या आठ जातिगृहस्थांच्या समोर तिची चौकशी करावी आणि मगच तिला काय शिक्षा करावयाची ती करावी.

विशाखा सासरीं राहायला गेली.

कांहीं दिवसांनीं मिगारश्रेष्ठीनें आपल्या मुलाच्या विवाहानिमित्त निर्ग्रंथ श्रमणांना ( नग्न संन्याशांना ) आपल्या घरीं भोजनाचें आमंत्रण केलें. मिगार-श्रेष्ठी निर्ग्रंथांचा उपासक होता. त्यांच्या भोजनासाठीं त्यानें उत्तम पक्वान्नांचा बेत केला होता. निर्ग्रंथ आसनावर जेवायला बसल्यावर मिगारानें स्वतः त्यांचें आदरातिथ्य केलें आणि जेवण झाल्यावर सुनेला—विशाखेला—निरोप पाठविला कीं, तूं अर्हतांना नमस्कार करायला बाहेर ये.

‘ अर्हत ’ शब्द ऐकतांच विशाखेला अत्यंत आनंद झाला. कारण विशा-खेनें लहानपणापासून बुद्धाबद्दल आणि बौद्ध भिक्षूंबद्दल बरेंच ऐकलें होतें, व त्यांच्यावर तिची भक्ति जडली होती. ती बुद्धाची उपासिका होती. बुद्ध आणि बौद्ध भिक्षू यांशिवाय अन्य कुणाला अर्हत म्हणतात याची तिला कल्पनाहि नव्हती.

सासऱ्याच्या निरोपाप्रमाणें घाईघाईनें पोषाख करून, ती आपला सासरा व ते नग्न श्रमण जेथें बसले होते तेथें गेली. पण पाहाते तों बुद्ध भिक्षूंऐवजीं नग्न श्रमण बसलेले ! त्या नग्न श्रमणांना पाहून तिला उबग आली, आणि तिनें सासऱ्याला ताबडतोब विचारलें, “ मला आपण येथें कशाला बोलाविलेंत ? असले नागडेउघडे लोक अर्हत कसे होऊं शकतील ? अशा निर्लज्यांना अर्हत कोण म्हणेल ? ” इतकें बोलून विशाखा तीरासारखी आंत निघून गेली.

विशाखेच्या या वागण्यानें सर्वांनाच धक्का बसला. ते श्रमण तर झालेल्या अपमानानें अतिशय संतापले व मिगारश्रेष्ठींला म्हणाले, "तूं ही अवदसा घरांत कोठून आणिलीस ? या जगांत तुझ्या मुलाला दुसरी एखादी मुलगी मिळाली नसती काय ?" मिगार म्हणाला, "महाराज, माझी सून अद्याप लहान आहे, पोरस्वभाव आहे, हळूहळू सुधारेल ! तिच्या या उद्धट वागण्याबद्दल आपण माझ्याकडे पाहून तिला क्षमा करावी." मिगारानें कशीबशी समजूत घालून त्या निर्ग्रंथांची एकदाची पाठवणी केली. नंतर मिगार स्वतः जेवायला बसला. विशाखा त्याला विंझण करीत बाजूला उभी होती. इतक्यांत दरवाजांत एक बौद्ध भिक्षु भिक्षा मागायला आला. मिगार बसल्या जागेवरून त्या भिक्षूकडे पाहात होता. त्यानें त्या भिक्षूला कांहीं वाढायला तर सांगितलें नाहींच, उलट त्याच्याकडे दुर्लक्ष करून तो तसाच जेवीत राहिला. सासऱ्याचें वागणें विशाखेच्या लक्षांत आलें. तेव्हां ती तेथूनच त्या भिक्षूला म्हणाली, "आर्य, माझा सासरा जुनेंपुराणें खात आहे, तेव्हां तुम्ही इथें उभें न राहतां पुढें जा !" विशाखेच्या शब्दांनीं आधींच रागावलेल्या मिगारच्या क्रोधाग्नींत जणूं कांहीं आहुतीच पडली ! तो संतापानें म्हणाला, "हें अन्न माझ्यापुढून घेऊन जा, आणि आतांच्या आतां या उर्मट व उन्मत्त मुलीला माझ्या घरांतून हांकलून द्या." मिगारनें संतापून जरी तिला घालवून देण्याची आज्ञा केली तरी तो स्वतः किंवा नोकर तिच्या अंगाला हात लावायला धजले नाहींत. सासऱ्याचें बोलून झाल्यावर विशाखा शांतपणें म्हणाली, "आपण माझ्यावर रागावूं नये. मी कांहीं विकत आणलेली दासी नाहीं. मी थोर कुलांतील कन्या आणि सून आहें. माझा अपराध कोणता तें प्रथम मला सांगा व मग मला येथून घालवून द्या. माझ्या वडिलांनीं येथें आठ कुलीन गृहस्थांना माझ्या अपराधाची चौकशी करायला सांगितलें आहे. तेव्हां त्यांच्यासमोर आपण माझा अपराध जर सिद्ध केलात तर मी क्षणभरहि येथें न थांबतां निघून जाईन."

त्या गृहस्थांनीं मिगाराचें बोलणें ऐकून घेतलें आणि विशाखेला प्रश्न केला, " आपला सासरा घाणेरडें अन्न खातो असें तूं कां म्हटलेंस ? "

" माझा सासरा जुन्यापुराण्यावर निर्वाह करतो, नवीन पुण्य मिळवीत नाहीं, असा माझ्या म्हणण्याचा अर्थ होता. म्हणून मी ' तो जुनें खातो ' असें म्हटलें, " विशाखा म्हणाली.

विशाखेचें उत्तर ऐकून ते गृहस्थ म्हणाले, " विशाखेचें म्हणणें गैर वाटत नाहीं, तर उलट शहाणपणाचेंच वाटतें. तेव्हां तिला घरांतून हांकलणें योग्य वाटत नाहीं. "

मिगार निरुत्तर झाला. त्यानें सुनेच्या आणखीहि बारीकसारीक दोषांची यादी त्यांच्यापुढें मांडिली. चौकशीअंतीं ते दोष नसून केवळ गैरसमज होते असें सिद्ध झालें.

इतकें झालें तरीं मिगाराचें मात्र पूर्ण समाधान झालें नव्हतें. तो म्हणाला, " हिच्या वडिलांनीं हिला सासरीं निघतांना आमच्यासमोर दहा नियम सांगितले होते ते आम्हांला तरी वेडेपणाचे दिसतात. मग हिला त्यांत काय अर्थ दिसला असेल तो असो ! "

" माझा संसार सुखी व्हावा म्हणून पित्यानें मला कसें वागावें यासंबंधीं ते नियम सांगितले होते. " विशाखा म्हणाली ' आंतली आग बाहेर नेऊं नये–' हा पहिला नियम. याचा अर्थ असा कीं, घरांत कांहीं भांडणें झालीं तर त्यांची वार्ता बाहेर पसरवूं नये.

' बाहेरची आग आंत आणूं नये '—हा दुसरा नियम. म्हणजे, शेजारी-पाजारी यांचे, सासू-सासऱ्यांचे किंवा जावा-नणंदांचे अवगुण बोलत असले तर तें वर्तमान घरांत आणूं नये.

' देणाऱ्यालाच द्यावें '—हा तिसरा नियम. म्हणजे, जो कोणी घरांतील वस्तु उसनी दिली असतां परत करतो त्यालाच ती द्यावी, व जो परत करीत नाहीं त्याला देऊं नये. ' देणारा किंवा न देणारा असला तरी

द्यावें —' हा पांचवा नियम. हा नियम आपल्या जवळच्या आप्तांना लागू आहे. आपल्या आप्तवर्गांपैकीं कुणी दरिद्री असला व उसनी घेतलेली वस्तु परत करण्याची त्याची कुवत नसली तरी त्याला द्यावें.

'सुखानें बसावें—' हा सहावा, 'सुखानें जेवावें —' हा सातवा, 'सुखानें निजावें—' हा आठवा नियम. यांचा अर्थ असा कीं, वडील माणसें जेथें वारंवार येत असतील तेथें बसूं नये; नोकरचाकरांचा समाचार घेऊन त्यांस जेवण वगैरे वाढून मग आपण जेवावें, आणि वडील माणसें निजल्यावर मगच आपण निजावें.

'अग्नीची पूजा करावी—' हा नववा नियम.

पतिव्रता स्त्रीला पति हा अग्नीसारखा पूज्य होय. ब्राह्मण ज्याप्रमाणें अग्नीची परिचर्या करतात तशी पत्नीनें पतीची सेवा करावी व त्याला सदैव प्रसन्न ठेवावें.

'गृहदेवतेची पूजा करावी—' हा दहावा नियम. म्हणजे, सासू-सासरे किंवा इतर वडील माणसें यांना गृहदेवता समजून त्यांची सेवा करावी. त्यांच्या ठिकाणीं आदरबुद्धि असावी.

विशाखेनें याप्रमाणें वडिलांनीं सांगितलेल्या दहाहि नियमांचें स्पष्टीकरण केलें. तें स्पष्टीकरण ऐकून मिगारला आपली चूक कळून आली. त्याला आपल्या शहाण्या, समंजस सुनेचें कौतुक वाटलें. निर्ग्रंथांच्या म्हणण्याप्रमाणें आपली सून अवदसा नसून लक्ष्मी आहे याची त्याला खात्री पटली. तेव्हां तिची त्यानें क्षमा मागितली. सासऱ्यानें आपली क्षमा मागावी हें विशाखेला रुचलें नाहीं. ती नम्रपणें म्हणाली, "आपण वडील आहां. क्षमा मागण्यासारखा मोटा अपराध आपण केला आहे असें मला वाटत नाहीं. पण एका गोष्टींत मात्र तुमचें माझें पटणार नाहीं. मी बौद्ध भिक्षूंना भिक्षा घातलेली आपल्याला पटणार नाहीं, व आपल्या घरीं येणाऱ्या निर्ग्रंथांना मी नमस्कार करणार नाहीं. तेव्हां याबाबत कांहीं तरी तोड काढल्याशिवाय माझ्या येथें राहाण्यानें आपणाला किंवा मला सुख प्राप्त होणार नाहीं."

मिगार म्हणाला, “ तुझ्या इच्छेप्रमाणें तूं वाग. माझ्या घरीं विपुल धन-दौलत आहे. तूं बौद्ध भिक्षूंना आमंत्रण दे. तुला त्यांना काय द्यावेंसें वाटेल तें तूं दे. त्यानें मी दरिद्री होणार नाहीं. मीहि माझ्या इच्छेप्रमाणें निर्ग्रंथांना घरीं बोलावीन, त्यांचा मानसन्मान करीन. तुला त्यांची सेवा करायला बोलाविणार नाहीं. ”

याप्रमाणें सासऱ्याचें आणि सुनेचें भांडण सामोपचारानें मिटलें.

विशाखेनें दुसऱ्या दिवशीं बुद्धाला आणि भिक्षुसंघाला आमंत्रण दिलें. हें वर्तमान निर्ग्रंथांना समजतांच त्यांनीं ताबडतोब मिगाराला त्याच्या या वागण्याचा जाब विचारला.

मिगारानें सांगितलें, “ माझी सून थोर कुळांतील आहे. तिला दासी-प्रमाणें वागवितां येणार नाहीं. माझ्या घरांत सुख नांदायचें असेल तर तिला योग्य तें स्वातंत्र्य दिलेंच पाहिजे.”


मिगाराचें उत्तर ऐकून निर्ग्रंथ म्हणाले, “ तूं बौद्ध भिक्षूंना घरीं येण्यास मनाई केली नाहींस तरी चालेल; पण तूं त्यांच्या दर्शनाला जाऊं नकोस, त्यांचा उपदेश ऐकूं नकोस.” मिगारनें त्यांचें हें म्हणणें मान्य केलें.

विशाखेच्या आमंत्रणाप्रमाणें गौतम बुद्ध बौद्ध भिक्षूंसह तिच्या घरीं जेवायला आले. तिनें आदरानें त्यांची चौकशी करून भोजन दिलें व शेवटीं कांहीं उपदेश करण्याची विनंती केली. बुद्धाचा उपदेश ऐकायला येण्याबद्दल विशाखेनें सासऱ्याला फारच आग्रहाची विनंती केली. तेव्हां ‘ आपण बुद्धाचें तोंड पहाणार नाहीं ’ असें त्यानें सांगितलें. विशाखा म्हणाली, “ आपण बुद्धाचें दर्शन घेणार नसाल तर घेऊं नका. पण पडद्याआडून त्यांचे शब्द ऐकायला हरकत कोणती ? ” अखेर मिगार पडद्याआडून उप-देश ऐकायला तयार झाला. विशाखेनें त्याच्या इच्छेप्रमाणें मोठा पडदा सोडून पलीकडे सासऱ्याची बसण्याची व्यवस्था केली.

सर्व मंडळी जमल्यावर बुद्धांनीं आपल्या वाणीनें उपदेश करायला सुरुवात केली. दान, शील, भावना, श्रद्धा इत्यादि गोष्टींचें त्यांनीं सुंदर विवेचन

केलें व जीवनांतील त्यांचें स्थान कोणतें तेंहि सांगितलें. बुद्धाच्या उपदेशामृतानें सर्वांचें अंतःकरण भरून आलें. मिगारहि याला अपवाद नव्हता. त्याच्या अहंकाराच्या शृंखला गळून पडल्या, व त्याला बुद्धाच्या थोरवीची प्रतीति आली. अशा साधुपुरुषाचें दर्शन न घेण्यानें आपण करंटे ठरलों असें त्याला वाटूं लागलें. त्याला पश्चात्ताप झाला आणि श्रद्धेच्या भावनेनें भारावलेला मिगार आवेगानें पडदा दूर करून धांवत बाहेर आला. त्यानें बुद्धांच्या पायांशीं आपलें मस्तक नम्र केलें व सद्गदित स्वरांत तो म्हणाला, " महाराज, माझ्या दुष्टपणाची क्षमा करावी. मी आजपासून आपला उपासक झालों आहें. आपल्या दर्शनाचा लाभ करून देऊन माझ्या जीवनाचें सार्थक होण्यास सर्वस्वी कारणीभूत झालेली विशाखा माझी सून असली तरी आजपासून ती मला मातेसमान पूज्य आहे. "

विशाखेला तेव्हांपासून 'मिगारमाता' असें नांव पडलें. विशाखेनें भिक्षूंसाठीं एक भव्य प्रासाद बांधून दिला. ती सर्वांची सोय पाही. आपल्या चातुर्यानें आणि असीम श्रद्धेनें विशाखा सर्वांची खरीखुरी माता बनली.





# महाप्रजापति गौतमी

गौतम बुद्धांनीं बुद्धत्व प्राप्त झाल्यावर बौद्ध संघाची स्थापना केली. या बौद्ध संघांत फक्त पुरुषांनाच प्रवेश मिळत असे; स्त्रियांना प्रवेश मिळत नसे. स्त्री ही मोक्षाच्या मार्गातील अडथळा आहे अशी तत्कालीन प्रचलित समजूत गौतम बुद्धांच्याहि मनांत पक्की रुजलेली असावी आणि स्त्रीला संन्यासमार्गानें चालणें शक्य होणार नाहीं असें त्यांना वाटत असावें. गौतमांच्या या समजुतीला धक्का देऊन स्त्रियांसाठीं भिक्षुणीसंघ स्थापन करायला भाग पाडणारी स्त्री म्हणजे महाप्रजापति गौतमी.

महाप्रजापति गौतमी ही गौतमांची आई मायादेवी हिची धाकटी बहीण. कपिलवस्तु शहराचा राजा शुद्धोदन याच्याशीं या दोनहि बहिणींचा विवाह झाला. त्या दोघींनाहि दोन पुत्र झाले. मायादेवीच्या पुत्राचें नांव गौतम व

गौतमीच्या पुत्राचें नांव नंद असें ठेवण्यांत आलें. गौतमाच्या दुर्दैवानें त्याच्या जन्माच्या सातव्या दिवशींच त्याची आई मायादेवी मरण पावली. राजा शुद्धोदन या आकस्मिक संकटानें खचून गेला. या मातृहीन बालकाचें वात्सल्यानें पालन करून मायेच्या सांवलीची उणीव पडूं न देतां त्याला योग्य वळण लावण्यास कोणती स्त्री तयार होईल यासंबंधीं त्याला काळजी वाटूं लागली. ही राजाची काळजी गौतमीनें दूर केली. आपल्या बालकाला तिनें दाईच्या स्वाधीन केलें, आणि जगाला नवसंदेश देण्यासाठीं अवतरलेल्या त्या पुत्राची—गौतमाची—ती माता बनली. तिनें आपल्या पुत्रापलीकडे त्याच्यावर प्रेम केलें.

कालांतरानें गौतम हा मुक्तीचा मार्ग शोधीत घरादाराचा–संसाराचा–मोह सोडून बाहेर पडला व तो बुद्ध झाला. गौतमानें घराबाहेर पडतांना आपल्या निर्गमनाची चाहूल कोणालाहि लागूं दिली नव्हती. तशी चाहूल लागूं देऊन मग त्यांची अनुमति घेऊन बाहेर पडणें हें केवळ अशक्यच होतें. राजपुत्र गौतम निघून गेला, आणि त्याच्याबरोबरच त्या राजघरांण्यातील चैतन्यहि अस्ताला गेलें.

गौतमानें घराबाहेर पडून मुक्तीचा मार्ग शोधून काढला आणि भिक्षुसंघाची स्थापना करून इतर मुमुक्षूंनाहि तो दाखवून दिला. मग त्यानें भिक्षुसंघाचें धर्मप्रचाराचें कार्य नेटानें सुरू केलें. धर्माचा प्रचार करीत करीत गौतम सर्व देशभर हिंडत होता. सर्वत्र त्याला अनुयायी मिळत होते. त्या अनुयायांसमवेत तो पुढें पुढें जात होता. एकदां आपल्या धर्माचा प्रचार करीत गौतम बुद्ध आपल्या राजधानीच्या शहरीं—कपिलवस्तु येथें—आला. राजधानीचा संपन्न राजपुत्र भणंग भिकारी होऊन भिक्षा मागायला आला होता. तेथें त्यानें इतर पौरजनांप्रमाणें आपल्या पित्याला, पुत्राला आणि पुतण्यालाहि या धर्माची दीक्षा दिली.

राजमाता गौतमी हें सारें पाहात होती. आपला पुत्र जगाचा लाल झाला आहे, अंधाऱ्या मार्गावरील प्रकाशमय दीपक झाला आहे, हें ती पाहात होती. जगद्वंद्य विभूति म्हणून मान्यता पावलेल्या बुद्धाच्या त्या मातेच्या हृदयांत विलक्षण खळबळ माजली होती. एकीकडे, तिला आपल्या पुत्राच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटत होता, तर दुसरीकडे गोकुळासारखें नांदतें शाक्यांचें राजघराणें कर्त्या पुरुषांच्या विरक्तीनें भयाण, शून्यवत् दिसत होतें. आपल्या मनाची ही तगमग शांत व्हायला आपणहि या संसारापासून दूर व्हायला हवें. अध्यात्माची कांस धरल्याशिवाय आपल्याला मनःशांति लाभणार नाहीं असें महाप्रजापति गौतमीला वाटूं लागलें. आपली ही संसारापासून परावृत्त होऊन संन्यास घ्यायची, भिक्षुसंघांत सामील व्हायची इच्छा तिनें गौतमाला कळविली. पण गौतमानें तिच्या विनंतीला नकार दिला. कदाचित् स्त्री ही मनानें आणि शरीरानें दुबळी आहे, तिला संघाच्या नियमांचें पालन करतां येणार नाहीं असें गौतमाला वाटलें असावें.

गौतमाच्या नकारानें महाप्रजापति गौतमीच्या मनावर वज्राघात झाला. आपल्या पुत्रानें केलेला हा अपमान त्या मानिनीला सहन झाला नाहीं. तिनें मनाशीं कांहीं निश्चय केला. या आपल्या निश्चयाप्रमाणें ज्यांना संसारापासून परावृत्त होऊन अंतिम मोक्षाचा मार्ग मिळवावयाचा होता अशा पांचशें स्त्रिया बरोबर घेऊन ती गौतमाकडे जायला निघाली.

तिनें आपल्या केसांचें वपन केलें. साधीं वस्त्रें परिधान केलीं आणि ऐश्वर्याचा त्याग करून पायीं चालत गौतमाकडे निघाली. मखमली गालिच्यावरून पावलें टाकणारी ती राजमाता दगडाधोंड्यांतून, कांट्याकुट्यांतून ठेंचाळत वाट तुडवीत चालली होती. दीर्घ प्रवास संपला. धुळीनें अंग माखलेलें, पाय कांट्याकुट्यांनीं व दगडाधोंड्यांनीं रक्तबंबाळ झालेले, अन्नपाण्यावांचून शरिराची दशा झालेली, श्रमानें थकलेली, पण दुर्दम्य इच्छाशक्तीचें तेज चेहेऱ्यावर विलसत असणारी अशी गौतमी गौतम बुद्धासमोर

येऊन उभी राहिली. गौतमानें स्त्रीचें हें आगळें रूप पाहिलें मात्र, आणि स्त्रीच्या सामर्थ्याची, सहनशीलतेची आणि साहसाची त्याला संपूर्ण कल्पना आली. मातेच्या इच्छेला होकार देणें त्याला भाग पडलें.

गौतमानें भिक्षुणीसंघाची स्थापना केली, आणि ज्या स्त्रियांना आपल्या अंतिम सुखाचा मार्ग मिळवावयाचा होता त्यांची सोय केली. याप्रमाणें महाप्रजापति गौतमी ही भिक्षुणीसंघाची आद्यप्रवर्तक ठरली.





# क्षेमा

जगांत अशीं माणसें दुर्मिळच सांपडतील: कीं ज्यांना विधात्यानें जन्माला घालतांना विलक्षण औदार्य दाखविलेलें असतें. सत्ता, संपत्ति, सौंदर्य आणि थोर कुल या सर्वांचा समन्वय एखाद्या स्त्रीला प्राप्त होणं ही वदतोव्याघातासारखीच दुर्मिळ गोष्ट ! या साऱ्या भाग्याच्या गोष्टी घेऊन क्षेमा जन्माला आली होती. मद्र देशाच्या राजाची ही कन्या. क्षेमा वयांत आल्याबरोबर सुंदर पुष्पाकडे भ्रमर ज्याप्रमाणें आमंत्रण नसतांनाहि रुंजी घालायला येतात, तसे किती तरी राजकुमार क्षेमेला मागणी घालायला येऊं लागले. प्रत्येकाला वाटत होतं, ह्या असामान्य सौंदर्याचे आपण दास व्हावं ! या अनेक राजपुत्रांप्रमाणें कोसल देशचा राजा बिंबिसार यानेंहि क्षेमेला मागणी घातली. राजा बिंबिसार गुणसंपन्न होता,

आपल्या प्रजेवर त्याचें असीम प्रेम होतें. ( पुढें तो गौतम बुद्धांचा श्रावक झाला. ) राजा बिंबिसाराची कीर्ति मद्र राजानें ऐकली होती. तेव्हां मद्र राजानें त्याची मागणी मान्य केली. दोन्ही राजांना शोभेशा समारंभांत राजा बिंबिसार आणि क्षेमा विवाहबद्ध झालीं. क्षेमा कोसलेश्वराची पट्टराणी झाली. सर्वतोपरींनीं क्षेमा भाग्यवान् होती. आपल्या पतीच्या सहवासांत त्याच्या प्रेमानें तिचें जीवन फुलत होतें.

त्याच वेळीं राजा बिंबिसार यानें वेळूवन नांवाचें एक प्रशस्त सुंदर उद्यान गौतम बुद्धांना दान केलें होतें. त्या वेळूवनांत गौतम बुद्ध आपल्या संघासह रहात होते. गौतमाविषयींची बरीच माहिती क्षेमेनें आपल्या पतीच्या तोंडून ऐकली होती. गौतम बुद्ध हे अनासक्त आहेत, त्यांना पार्थिव सौंदर्या-बद्दल अभिरुचि नाहीं, त्या सौंदर्याबद्दल आसक्ति नाहीं, त्याचें महत्त्व नाहीं, ऐहिक सुखांची, समृद्धींची त्यांना पर्वा नाहीं; इतकेंच नव्हे तर त्या सौंदर्या-तील दोषस्थळें हुडकून काढण्यांत ते पटाईत आहेत, इत्यादि गोष्टी क्षेमेच्या कानांवर आल्या होत्या. क्षेमेला सर्वांकडून तिच्या सौंदर्याची स्तुति ऐकण्याची संवय झाली होती. अतिशय लाडावलेल्या मुलाला जरा कुणीं ' हत् ' म्हट-लेलें जसें आवडत नाहीं, तसेंच क्षेमेला आपल्या सौंदर्यांतील दोष काढलेले खपत नसे. राजा बिंबिसार स्वतः गौतमांचा अनुयायी असल्यानें त्यांच्यावर त्याची विलक्षण निष्ठा होती. आपल्या पत्नीनेंहि त्यांच्या दर्शनाला जावें असें त्याला सारखें वाटे. पत्नीला त्यानें पर्यायानें आपलें मनोगत कळविलेंहि. पण आपल्या सौंदर्याच्या गर्वानें धुंद झालेली ती स्त्री मनांतील भगवान् बुद्धां-विषयींच्या अढीमुळें पतीची इच्छा मान्य करून त्यांच्या दर्शनाला जायला राजी नव्हती. राजाला आपल्या पत्नीचें हें वर्तन आवडत नव्हतें; परंतु तिच्या-वरील निस्सीम प्रेमामुळें तिचें मन दुखवून तिच्यावर सक्ति करायलाहि त्याचें मन होत नव्हतें. तिच्या सौंदर्याचा गर्व दूर व्हावा, तिच्या अंतःकरणांत गौतमांविषयीं भक्तिभावना, श्रद्धा उत्पन्न व्हावी यासाठीं त्यानें बराच विचार करून एक युक्ति शोधून काढली.

# क्षेमा

राजा बिंबिसार गुणिजनांचा चाहता होता. त्याच्या पदरीं उत्तम कवि होते. त्या कवींना त्यानें एकदां बोलावून आणलें आणि विचारलें कीं, 'तुम्ही आपली प्रतिभा पणाला लावून वेळूवनावर एक नितांतरमणीय असें काव्य निर्माण करूं शकाल का?' आत्मविश्वासानें त्या कवींनीं सांगितलें, "महाराज, आपली आज्ञा आम्हाला मान्य आहे. वेळूवनाचें अप्रतिम निसर्गसौंदर्य आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यानें आम्ही शब्दांकित करूं आणि तें छंदोरूप निसर्गसौंदर्य जर किनरीच्या साथीवर गायिलें गेलें तर त्या स्वरालापांनीं आणि त्यांतल्या रसानें ऐकणाऱ्याचें मन मोहून गेल्याशिवाय, भारावून गेल्याशिवाय, राहणार नाहीं असें आम्हांला वाटतें."

कवींच्या या आत्मविश्वासपूर्वक शब्दांनीं राजाचें मन प्रसन्न झालें. राजा म्हणाला, 'तुम्ही असें काव्य लिहून आणा आणि नंतर तें एखाद्या उत्तम गायकाकडून राणीच्या कानांवर घालायची व्यवस्था आम्ही करूं.'

राजाच्या विनंतीप्रमाणें त्या प्रतिभाशाली कवींनीं काव्य लिहिलें व राजाला सादर केलें. त्या काव्यांत वेळूवनाचें सौंदर्य त्यांनीं साक्षात् केलें. राजानें एकदां दरबार बोलावून त्या दरबारांत तें काव्य गाण्याची आज्ञा केली. क्षेमा राणीही दरबारांत बसली होती. किनरीच्या सुरांवर काव्य गायिलें जाऊं लागलें. त्या काव्याचे स्वर आणि त्यांतला अर्थ, त्यांतलें जिवंत निसर्गसौंदर्य त्या काव्यांतील शब्दाशब्दांतून ओसंडत होतें. सारी सभा तटस्थ होऊन वेळूवनाच्या सौंदर्याचें रसिकतेनें पान करून डोलूं लागली होती. राणीहि हृदयाचे कान करून तें काव्य ऐकत होती. काव्य संपलें. गायकांनीं किनरी खालीं ठेवली. राजाला प्रणिपात केला. दरबार संपला. तेथील प्रत्येक व्यक्ति तृप्त अंतःकरणानें बाहेर पडली.

क्षेमेचें मन तर तें काव्य ऐकून अगदीं हुरळून गेलें. एवढें अप्रतिम सौंदर्यस्थळ आपण पाहिलें नाहीं याबद्दल तिला फार खेद वाटला. ती लगेच राजाकडे गेली आणि राजाला म्हणाली, "महाराज, आपणांला एक विनंती करायची आहे!"

राजानें विचारलें, " काय विनंती आहे ती सांगावी. "

" महाराज, मला वेळूवन पहायला जायची महाराजांनीं अनुज्ञा द्यावी."

राजाचा हेतु सफल झाला होता. राजा हंसून म्हणाला, " देवी, वेळूवन पाहायला जायची आपल्याला इच्छा झाली ही भाग्याची गोष्ट आहे. माणसाचें मन मोहून टाकणारें असेंच तें स्वर्गीय सौंदर्यानें नटलेलें वेळूवन खरोखरच प्रत्येकानें एकदां तरी पाहाण्यासारखें आहे. मात्र एक गोष्ट आपण लक्षांत ठेवा कीं, तिथें नेल्यावर गौतम बुद्धांचें दर्शन घेतल्याशिवाय, त्यांना प्रणाम केल्याशिवाय आपणास परत येतां येणार नाही. हें जर आपल्याला मान्य असेल तर आपण आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तेव्हां वेळूवन पाहायला जाऊं शकतां. माझी ना नाहीं. "

क्षेमेनें राजाला कांहीं उत्तर दिलें नाहीं. ती नुसती हंसली. त्या मानिनीच्या हास्यांत केवढा तरी अर्थ भरलेला होता.

राजाची अनुज्ञा घेऊन क्षेमा आपल्या परिवारासह वेळूवन पाहायला गेली. राजानें निघतांना आपल्या लोकांना सांगून ठेवलें कीं, " देवी उद्यान पाहून माघारीं फिरतांना आपण होऊन गौतम बुद्धांच्या दर्शनाला गेली तर ठीक, नाहीं तर तुम्ही राजाची आम्हांला अशी आज्ञा आहे " असें निक्षून सांगून तुम्ही तिला त्यांच्या दर्शनाला घेऊन जा असें सांगितलें.

राणी परिवारासह उद्यानांत गेली. त्या उद्यानाची अपूर्व शोभा पाहात ती हिंडत होती. फुलांफळांनीं बहरलेली वृक्षराजि, त्या वृक्षांना दृढ आलिंगनाच्या मिषानें लपेटलेल्या नाजूक लता, स्वच्छंदपणें थुइथुइ नाचणारीं कारंजीं, झुळझुळ वाहणारा सुगंधानें भारावलेला वारा आणि या उद्यानांत वावरणारे सुंदर पशु-पक्षी, या सर्वांचें रसिकवृत्तीनें तिनें दर्शन घेतलें. राणीचें मन अत्यंत प्रसन्न झालें. अननुभूत सौंदर्यदर्शनानें ती हरखून गेली. आणि तिनें आपल्या सेवकांना ' आतां परत फिरूं या ' असें सांगितलें. गौतम बुद्धांचें वसतिस्थान पाहायला जायचें मात्र तिनें टाळलें; इतकेंच नव्हे तर

त्यांच्या अस्तित्वाची आपल्याला जणूं जाणीवहि नाहीं असें तिनें भासविलें. राणीनें असें वागावें यांत राजसेवकांना कांहीं वावगें वाटलें नाहीं. किंबहुना त्यांनीं तें अपेक्षिलें होतें. राणीनें जाण्याचें नांव काढतांच राजसेवकांनीं राजाची आपणांला गौतमांचें दर्शन करविल्याशिवाय परत न येण्याची सक्त ताकीद असल्याचें सांगितलें. राणीचा नाइलाज झाला. मनांत ती चिडली. पण चेहेऱ्यावर कांहींहि मनोविकार न दर्शवितां ती सेवकांबरोबर गौतम बुद्धांच्या दर्शनाला निघाली.

गौतम बुद्धांनीं आपल्या आत्मिक बलानें क्षेमाराणी आपल्याकडे येत आहे हें जाणलें. तिच्या मनांत आपल्या सौंदर्याचा आत्यंतिक गर्व आहे, आपल्या दर्शनाला येण्याचें ती टाळीत होती व केवळ राजाची आज्ञा म्हणून नाइलाजानें मनांत नाराज होऊन ती आपल्याकडे येत आहे हेंहि त्यांनीं जाणलें. माणसाच्या मनांत अशा प्रकारच्या कुविचारांनीं ठाण मांडलें तर त्याचा विकास होऊं शकत नाहीं. तेव्हां असे कुविचार दूर करून माणसाला सम्यक् विचार करायला लावावा, त्याचें स्वतःचें हित कशांत आहे तें त्याला समजावें आणि मानव खऱ्या अर्थानें सुखी व्हावा यासाठीं तळमळणारें गौतम बुद्धांचें मन क्षेमेला प्रकाश देण्यासाठीं तयार झालें. गौतम बुद्धांनीं क्षेमा अगदीं आपल्या जवळ येत आहे असें पाहून आपल्या ऋद्धींच्या सामर्थ्यानें एक असामान्य स्वर्गीय सौंदर्याची स्त्री निर्माण करून ती हातांत पंखा घेऊन भगवान् बुद्धांना वारा घालीत आहे असें दृश्य निर्माण केलें. क्षेमा पुढें आली आणि तिनें पाहिलें तों गौतम बुद्धांची ती धीरगंभीर प्रशान्त मूर्ति, आणि त्या मूर्तीला रत्नजडित पंख्यानें वारा घालणारें तें मूर्तिमंत सौंदर्य यानें क्षेमा दिपून गेली. तिचें भान हरपलें. अनिमिष नेत्रांनीं आश्चर्यचकित होऊन क्षेमा तें दृश्य पाहातच राहिली. कांहीं क्षणानें आश्चर्याचा, विस्मयाचा धक्का कमी झाल्यावर तिच्या मनांत विचार आला "एवढी सुंदर स्त्री गौतम बुद्धांची सेवा करीत आहे आणि मी—मी तर त्या सौंदर्यसम्राज्ञीच्या

एकशतांशहि सुंदर नाही. आपण आपल्या सौंदर्याचा व्यर्थ गर्व वाहिला. त्या गर्वानें या साधुपुरुषाच्या दर्शनास येण्यालाहि मीं नकार दिला...केवढा माझा अहंकार !" असा विचार करीत ती तें दृश्य पाहात असतांनाच एकदम गौतमांजवळ वारा घालीत उभ्या असलेल्या त्या मुग्ध स्त्रीच्या पहिल्या तारुण्याचा बहर ओसरूं लागून तिचें सौंदर्य कमी होऊं लागलें आहे, अशा प्रौढेंत तिचें रूपांतर होऊं लागलें. क्षेमा अनिमिष नेत्रांनीं पाहातच होती. इतक्यांत त्या स्त्रीच्या देहावर सुरकुत्या पडूं लागल्या. तिची काकडी-सारखी कोंवळी काया एखाद्या सुकलेल्या वृक्षासारखी ताठ झाली. तिचा काळाभोर केशसंभार पांढऱ्या चवरीसारखा दिसूं लागला. तिचीं गात्रें विकल झालीं, तोंडाचें बोळकें झालें, मान नत्रा करूं लागली आणि थरथरत्या हातानें वारा घालीत असतांनाच ती स्त्री एकदम गतप्राण होऊन धरणीवर कोसळली. क्षेमा हें जीवनांतील कटु सत्य प्रत्यक्ष पाहात होती. मानवी जीवनाचें सम्यक् दर्शन जणूं तिला घडत होतें. सौंदर्यसंपन्न असा हा मानवी देह विरूप होऊन शेवटीं नष्ट होणार आहे, मातीला मिळणार आहे हें तिला प्रत्यक्ष दिसत होतें. क्षेमेचें मन विलक्षण भेदरून गेलें. त्या दृश्यानें त्या रूप-गर्वितेच्या मनाला तडा गेला. "माझें सुंदर शरीरहि याच गतीला जाणार !" असा नाद तिच्या शरीरांतील कणाकणांतून तिला ऐकूं येऊं लागला. व्यर्थ आपण गर्व केला असें तिला वाटलें. मनाच्या अशा संभ्रमावस्थेंत ती असतांनाच गौतमांना तिचा गर्वपरिहार झाला आहे हें लक्षांत येऊन त्यांनीं "स्वतः तयार केलेल्या जाळ्यांत सांपडणाऱ्या माकडाप्रमाणें ऐहिक सुखास भुलून त्यांस चिकटलेले लोक जन्ममरणाच्या प्रवाहांत पडतात, पण निरपेक्षी लोक त्या प्रवाहाचा छेद करून प्रव्रजित होत्साते कामसुखाचा नाश करतात" अशा अर्थाची गाथा म्हटली. क्षेमेच्या अंतःकरणांत एकदम प्रकाश पडला. भगवान् बुद्धांना विनीत भावानें तिनें प्रणाम केला आणि ती मागें फिरली.

ती परत येऊन राजाला भेटली. राजानें तिला कसा काय प्रवास झाला, तुला वेळूवन आवडलें का, असे अनेक प्रश्न केले. क्षेमेनें राजाच्या प्रश्नांचीं योग्य उत्तरें दिलीं. मात्र तिचें मन दुसऱ्याच कसल्या तरी विचारांत गुंतल्यासारखें वाटत होतें. क्षेमकुशलासंबंधीं बोलून झाल्यावर ती राजाला म्हणाली, " महाराज, मला आपण प्रव्रज्या घेण्यास परवानगी द्यावी. " राजा तिचे शब्द ऐकून चकित झाला. क्षेमेसारखी सौंदर्यमानिनी गौतम बुद्धांच्या केवळ एक वेळच्या दर्शनानें एवढी बदलली यावर त्याला विश्वास ठेवणें कठीण वाटूं लागलें. आपल्या मनांतली शंका त्यानें तिला विचारली. तो म्हणाला, " देवी, आम्ही गौतम बुद्धांच्या नेहमीं दर्शनाला जातों, पण आम्हांला अद्याप प्रव्रज्या घेण्याला मनाची जी उत्कट अवस्था लागते ती प्राप्त झाली नाहीं; आणि आपण मात्र भगवानांच्या केवळ एकदांच दर्शनाला जाऊन मनाची एवढी तयारी कशी करूं शकला ? "

क्षेमा हंसून म्हणाली, " महाराज, आपल्या प्रश्नाचें उत्तर मला देतां येणार नाहीं. पण भगवानांचें तेजस्वी व्यक्तिमत्व आणि त्यांची ज्ञानमय वाणी यांनीं माझे डोळे खाडकन् उघडले. मानवी शरीर नाशवंत आहे या महान् सत्याची मला जाणीव झाली. आणि माणसाचें अंतिम हित केवळ संसारसुखांत गुरफटून राहाण्यांत नसून त्यांतून मुक्त होण्यांत आहे हें माझ्या लक्षांत आलें ! मग प्रव्रज्या घेण्याला आपण मला अनुमति द्याल ना ? "

राजानें आनंदानें क्षेमेला प्रव्रज्या घेण्याची परवानगी दिली. क्षेमा राजाची अनुमति ऐकून बौद्ध भिक्षुणीसंघांत सामील झाली. आपल्या अंगच्या गुणांनीं आणि कर्तृत्वानें ' महाप्रज्ञावति क्षेमा ' असा तिनें नांवलौकिक मिळविला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29623 वि: चरित्र
क्रमांक ५८४ नों: दि: २०/५/५०



# कृशा गौतमी

कृशा गौतमी हिचा जन्म श्रावस्ती नगरांत एका अत्यंत गरीब कुटुंबांत झाला. हिचें खरें नांव गौतमी, पण ती अत्यंत कृश असल्यामुळें 'कृशा गौतमी' या नांवानें तिला सर्वजण संबोधीत असत. लहानपणी तिच्या आयुष्यांत एक चमत्कार घडला आणि ही गरीबाची मुलगी एकदम एका कुबेराची सून झाली. तो चमत्कार असा—

एकदां श्रावस्ती नगरांत एका श्रीमंत व्यापाऱ्याचें चाळीस कोटि धन अकस्मात् कोळसे होऊन पडलें. या दुर्दैवी चमत्कारानें व्यापारी अगदीं पार खचून गेला. त्यानें अंथरूण धरलें. तेव्हां त्याच्या एका मित्रानें त्याला सल्ला दिला कीं, तूं हे कोळसे घेऊन बाजारांत विकायला बस. मित्राच्या सांगण्याप्रमाणें व्यापाऱ्यानें ती कोळशाची रास आणून मांडली व नशिबाला दोष देत डोक्याला हात लावून तो तेथेंच बसून राहिला. जाणारे येणारे लोक आणि इतर व्यापारी त्याच्याकडे पाहून हंसत होते, त्याचा उपहास करीत

होते. व्यापारी अगदीं खिन्न होऊन गेला होता. इतक्यांत त्या रस्त्यानें एक गरीब मुलगी जात होती, ती त्या कोळशाच्या ढिगाकडे पाहून म्हणाली, " अरे, बाकीचे लोक निरनिराळ्या वस्तु विकत आहेत, तर हा मनुष्य सुवर्णमोहोरा विकत आहे ! " त्या मुलीचे हे उद्गार व्यापाऱ्यानें ऐकले. त्यानें त्या मुलीला हांक मारली आणि विचारलें, " मुली, हे प्रत्यक्ष कोळसे असतांना तूं ह्यांना सुवर्णमुद्रा असें कां म्हटलेंस ? "

मुलगी म्हणाली, " मला जें दिसलें तें मी बोलले. " इतकें बोलून तिनें चटकन् त्या राशींत हात घातला आणि मूठ उघडून व्यापाऱ्यास दाखविली. खरोखरच तिच्या हातांत सुवर्णमुद्रा चकाकत होत्या. हा चमत्कार पाहून तो व्यापारी आनंद आणि आश्चर्य यांनीं भारावून गेला. त्यानें त्या मुलीकडून तिचें नांव व पत्ता काढून घेऊन मग स्वतः घरीं गेला.

दुसऱ्या दिवशीं तो व्यापारी कृशा गौतमीच्या वडिलांकडे गेला आणि त्या मुलीला सून म्हणून घरांत आणण्याची आपली इच्छा त्यांना सांगितली. हें ऐकून सर्वांनाच आनंद झाला. अशा रीतीनें कृशा गौतमी एका बड्या व्यापाऱ्याची सून झाली. पुढें तेथें आपल्या हस्तस्पर्शानें तें कोळसे झालेलें धन तिनें परत सुवर्णमय करून टाकलें.

कृशा गौतमी आपल्या पतीच्या घरीं नांदत होती. स्वभावानें सालस, सर्वांना जपणारी गौतमी जरी थोरांघरची सून झालेली असली तरी ती गरीब कुळांतील आहे, आपल्या तोलाची नाहीं असें तिच्या घरच्या माणसांना वाटे. त्याबद्दल तीं माणसें पुष्कळदां तिची उपहासानें कुचेष्टा करीत. पण कृशा गौतमी सारें निमूटपणें सहन करी.

कांहीं दिवसांनीं कृशा गौतमीला एक पुत्र झाला. पुत्रजन्मानें तिच्या घरांतल्या माणसांकडून होणाऱ्या तिच्या छळाला थोडासा आळा बसला. सारीं माणसें बाळाच्या कौतुकापुढें त्याच्या आईचें उणेंदुणें काढायचें विसरून गेलीं. कृशा गौतमीहि बाळाच्या कौतुकांत दंग झाली होती. तिचें

दिवस आनंदानें चालले होते; पण दैवाला तिचें हें सुख पाहावलें नाहीं. एके दिवशीं कसल्या तरी आजाराचें निमित्त झालें, आणि तिचा लाडका बाळ काळानें झडप घालून तिच्यापासून हिरावून नेला.

एकुलत्या एका लाडक्या पुत्राच्या मृत्यूनें कृशा गौतमीच्या मनावर दारुण आघात झाला. मुलाचें प्रेत उराशीं घट्ट कवटाळून ती घराबाहेर पडली, आणि जो भेटेल त्याची "माझ्या बाळाला बरें करा हो! त्याला कांहीं तरी औषध द्या, तो हंसेल, खेळेल असें करा" अशी विनवणी करूं लागली. मेलेल्याला जिवंत करण्याचें सामर्थ्य माणसांत कोठून असणार! जो तो तिची समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न करी. "तें मूल आतां पुन्हां कधींहि हंसणार नाहीं, खेळणार नाहीं. तूं त्या कलेवराचा मोह सोडून दे" असें सांगत. पण कृशा गौतमी कोणाचेंहि ऐकेना कीं आपला हट्ट सोडीना.

ती अशीच वेड्यासारखी बेभान होऊन हिंडत असतां तिला एक बौद्ध भिक्षु भेटला. तिनें त्यालाहि मुलाला जिवंत करण्याची विनंती केली. त्यानें ती ऐकून घेतली आणि तिला सांगितलें, "तूं माझ्याबरोबर चल. येथें जवळच गौतम बुद्ध राहातात. ते तुझ्या बाळाला बरें करण्याचा कांहीं उपाय सांगतील." त्या भिक्षूच्या आश्वासनानें कृशा गौतमीचें वेडें मन आशेनें मोहरलें. ती लागलीच त्या भिक्षूबरोबर गौतम बुद्धांकडे जावयाला तयार झाली.

गौतमांनीं तिला बसवून घेतलें आणि तिच्याकडून झालेली सर्व हकीकत विचारून घेतली. प्रथम, तें बालक मृत झालें आहे याबद्दल त्यांनीं खात्री करून घेतली, आणि मग अतिशय शांतपणें ते म्हणाले, "तुझ्या मुलावर मी औषधोपचार करीन, पण त्यासाठीं एका वस्तूची गरज आहे. तूं ती मला आणून दे." गौतमी म्हणाली, "आपण सांगाल तें करायला मी तयार आहें. माझा बाळ बरा करा म्हणजे झालें." गौतम बुद्ध म्हणाले, "तूं अशीच गांवांत जा, आणि ज्या घरांत कधींहि कुणी माणूस मेलेलें नसेल अशा

घरांतून थोडे राईचे दाणे घेऊन ये. " गौतम बुद्धांच्या सांगण्याप्रमाणें कृशा गौतमी राईचे दाणे आणण्यासाठीं गांवांत निघाली. घरोघर जाऊन तिनें दाण्यांची मागणी केली. पण ज्या घरांत कधींच कोणीही मेलेलें नाहीं असें घर तिला सांपडेना. ठिकठिकाणीं तिला मृतांच्या कथाहि ऐकाव्या लागल्या. कृशा गौतमीचें मन आतां सांवरलें गेलें. " मृत्यु हा जगाचा सनातन अटळ नियम आहे, " या सत्याची तिला जाणीव झाली. आपली चूक, आपला वेडेपणा तिला उमगून आला. मुलाचें प्रेत घेऊन ती तशीच स्मशानांत गेली आणि तें प्रेत तेथें टाकून पुन्हां गौतमाच्या पायाशीं आली. तिनें झालेली हकीकत त्यांना निवेदन केली. गौतम बुद्धांनीं तिला उपदेश करून तिचें मन शांत केलें. पुत्रवियोगानें आधींच उदास झालेलें तिचें मन जगांतील जीवाचें दुःख पाहून अधिकच उद्विग्न झालें. तिनें पुन्हा घरीं जाऊन संसार करण्या-ऐवजीं भिक्षुणी होऊन आपल्या शाश्वत सुखाचा मार्ग मिळविला.


कृशा गौतमी या स्त्रीचा उल्लेख गौतम बुद्धांच्या चरित्रांत आणखी एके ठिकाणीं आढळतो. हिचा व गौतम बुद्धांचा प्रत्यक्ष परिचय नव्हता. मात्र हिच्या एका उक्तीनें त्यांच्या जीवनांत जी क्रांति घडवून आणली ती विलक्षणच आहे.

एकदां युवराज गौतम आपल्या लवाजम्यानिशीं घोड्यावर स्वार होऊन नगरांतून चालला होता. गौतमाचें उमदें तारुण्य, त्याचें असामान्य सौंदर्य आणि वैभव पाहून सौधावर उभ्या असलेल्या या स्त्रीच्या तोंडून असावध-पणें पुढील धन्योद्गार बाहेर पडले :

" निब्बुता नून सा माता । निब्बुतो नून सो पिता
निब्बुता नून सा नारी । यस्यायं इदिसो पति ॥ "

" या पुरुषाची मातापिता धन्य आहेत. आणि ज्या स्त्रीला असा पति लाभला आहे ती भार्यासुद्धां धन्यच होय ! " हे उद्गार गौतमाच्या कानांवर आले. त्यानें चमकून वर पाहिलें. त्याच्या नजरेला ती तरुणी पडली. तिच्या

शब्दांनीं गौतमाला ज्या ध्येयाची ओढ लागली होती, पण ज्या ध्येयदर्शनाचा मार्ग सांपडला नव्हता तें सत्य एकदम त्याच्या मनांत स्फुरल्यासारखें झालें. आणि ‘ प्रव्रज्या ( संन्यास, त्याग ) हीच मानवी जीवनाच्या सार्थक्याची गुरुकिल्ली आहे ’ अशी जाणीव त्यांच्या मनांत उदय पावली. या जाणीवेनें त्यांचें अंतःकरण समाधान पावलें, आणि ही जाणीव करून देणाऱ्या स्त्रीबद्दल कृतज्ञता वाटून त्यानें आपल्या गळ्यांतील बहुमोल रत्नमाला तिला दिली. भाबड्या गौतमीला वाटलें कीं राजपुत्र आपल्यावर भाळला. परंतु कृतज्ञतेशिवाय अन्य कसल्याहि भावनेचा स्पर्श गौतमाच्या मनाला झाला नव्हता. याप्रमाणें नकळत कृशा गौतमी ही गौतम बुद्धांची मार्गदर्शिका ठरली.





# यशोधरा

(अजिंठा लेणीं क्र. १७–बुद्ध, यशोधरा व राहुल यांची भेट.)

यशोधरा ही गौतम बुद्धाची पत्नी ! महापुरुषाची पत्नी होणें ही गोष्ट भाग्याची आहे हें खरें, पण तें पत्नीपद भूषविणाऱ्या स्त्रीला पुष्कळदां अनंत यातनांना तोंड द्यावें लागतें. गौतमा-

सारख्या महापुरुषाची पत्नी झालेल्या यशोधरेला असेंच सुखदुःखांच्या भोंवऱ्यांत सांपडावें लागलें.

यशोधरा ही शाक्यकुलांतील सुप्रबुद्ध नांवाच्या शाक्याची मुलगी. यौवनाच्या उंबरठ्यावर पाऊल टाकणारी लावण्यसंपन्न यशोधरा वैशालीचा संपन्न सम्राट् शुद्धोधन याच्या पुत्राची प्रिय पत्नी झाली. अमाप वैभव आणि तरुण, सुंदर, संपन्न पति या सर्व सुखांत वावरणाऱ्या यशोधरेला दिवस केव्हां उगवले आणि मावळले याचें भानहि राहिलें नाहीं. कालांतरानें तिच्या स्त्रीत्वाची पूर्णता झाली—तिला एक पुत्र झाला. यशोधरेचें आयुष्य सर्व अर्थांनीं संपन्न झालें पण...दैवाला हें सुख पाहावलें नाहीं. गौतमाला—तिच्या पतीला—संसाराचा उबग आला. जीवनांतल्या जरा, रोग, मृत्यु या दुःख-त्रयीचें भीषण स्वरूप त्याला अनाहूतपणें दिसलें. त्या दर्शनानें सुखी, संपन्न जीवनाला तडा गेला. तो हा तडा सांधणारा—जीवन खऱ्याखुऱ्या अर्थानें संपन्न बनविणारा—मार्ग शोधूं लागला. हा मार्ग या राजवाड्यांतील भिंती ओलांडल्यावांचून सांपडणार नाहीं, हें त्याच्या लक्षांत आलें. त्यानें घरा-दाराचा त्याग करायचें ठरविलें. एवढ्या मोठ्या गजबजलेल्या वाड्यांतून, राजधानींतून फकीर होऊन बाहेर पडणें सोपें नव्हतें. कुणालाहि आपल्या कृतीची चाहूल लागूं न देतां त्याला बाहेर पडावयाचें होतें. या संधीची तो वाट पाहात होता. गौतमाच्या सुदैवानें आणि यशोधरेच्या दुर्दैवानें अशी संधि त्याला लवकरच सांपडली.

रात्रीच्या दुलईत सारें विश्व निवान्त झोंपीं गेलें होतें. झोंपलेल्या माणसांच्या उच्छ्वासाशिवाय कसलाहि आवाज ऐकूं येत नव्हता. सुखस्वप्न रंगवीत यशोधराहि झोंपीं गेली होती. गौतम मात्र यावेळीं आपल्या मंचकावर तळमळत पडला होता. 'या निशा सर्वभूतानाम् तस्याम् जागर्ति संयमी। यस्याम् जागर्ति भूतानि सा निशा पश्यतो मुनि' ॥ याप्रमाणें तो जागृत होता. जीवनाच्या सम्यक् ज्ञानाची त्याला जाणीव होऊं लागली होती. तो

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक

हळूच उठला आणि राजवाड्याबाहेर जाण्यासाठीं निघाला. इतक्यांत त्याला आपल्या प्रिय पत्नीची, इवल्याशा गोड बाळाची आठवण झाली. वैभवाचा मोह सोडणें सोपें, पण हीं बिसतंतूंसारखीं नाजूक बंधनें सहजासहजीं तोडणें कठीण होतें. मनाचा धडा करून त्यानें आपलीं पावलें यशोधरेच्या महाला-कडे वळविलीं. ज्या प्रिय माणसांचा त्याग करावयाचा होता, त्यांना एकदां डोळे भरून पाहायचें होतें. पावलें न वाजवितां गौतम महालाच्या उंबरठ्यावर आला. यशोधरा नूतन बालकाला कुशींत घेऊन शांत झोपीं गेली होती. बाळ झोपेंत हंसत होता. तें विलोभनीय दृश्य पाहून त्यांच्या चिरंतन वियो-गाच्या कल्पनेनें क्षणभर गौतम विव्हळ झाला. निदान यशोधरेचा शेवटचा निरोप घ्यावा, इवल्या बाळाचा गोड पापा घ्यावा, असें गौतमाला वाटलें. त्याचीं पावलें घुटमळूं लागलीं. पण मनांतला विचार झटकून टाकून तो माघारा वळला, आणि संसारापासून दूरदूर निघून गेला. साऱ्या सुखांकडे पाठमोरा होऊन निघून गेला.

रात्र संपली, रजनीनें आपली काळी दुलई विश्वावरून दूर केली. तान्हुल्याच्या चाळवाचाळवीनें यशोधरा जागी झाली. यशोधरेच्या सुखाचा अपहार करून ती पहाट उगवली होती, याची बिचाऱ्या यशोधरेला कल्प-नाहि नव्हती....पण आगीसारखी चोहोंकडे भडकून पसरलेली बातमी यशोधरेच्या कानांवर आदळली—'सिद्धार्थ नाहींसा झाला!' यशोधरेवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला!

सौंदर्यशालिनी यशोधरेला कोठल्याहि गोष्टीची कमतरता नव्हती, सर्व सुखें हात जोडून उभीं होतीं. यशोधरेनें मनांत आणलें असतें तर तिला सारीं सुखें उपभोगतां आलीं असतीं, पण तिनें सर्वांना नकार दिला आणि आपल्या जीवनाचा मार्ग तिनें निश्चित केला.

गौतम मोठा होत होता, ज्ञानसंपन्न होत होता, मानवमात्राला सुखी करूं पाहात होता, विश्वाला त्याच्या अंतिम सुखाचा—मोक्षाचा—मार्ग दाखवीत

होता, सर्वसंगपरित्याग करून भिक्षावृत्तीनें रहात होता. गौतमाच्या या सर्व गोष्टी यशोधरेच्या कानांपर्यंत आल्या. ती आर्य स्त्री आपलेंहि मन तयार करीत होती. पतीच्या व्यक्तित्वांत विलीन झालेली यशोधरा, पति दूर गेला असला तरी त्याचें वेगळें अस्तित्व मानायला तयार नव्हती. पति संसाराचा मोह सोडून जें जें व्रत आचरीत होता, तें तें यशोधरा घरांत आचरीत होती. तीहि संन्यासिनी–विरागिनी बनली.

काल पुढें पुढें जात होता. यशोधरेचा पुत्र राहुल आतां मोठा होत होता. गौतमहि भिक्षु संघाची स्थापना करून देशोदेशीं बौद्ध धर्माचा प्रचार करीत फिरत होता. एकदां फिरतां फिरतां तो वैशालीला आला. वैशालीचा राजा भणंगभिकारी होऊन राजनगरांत आला होता. सारी वैशाली आनंदून गेली. आपल्या राजाला, त्या ज्ञानसंपन्न योग्याला पाहायला सारे धांवत होते. सारें नगर त्याच्या दर्शनाला धांवलें. धांवली नाहीं ती एकटी मानिनी यशोधरा ! तिच्या हृदयांत या वेळीं केवढें काहूर उठलें होतें ! राजवाड्याच्या सौधावर उभी राहून यशोधरा आपल्या जगद्वंद्य पतीकडे पाहात होती. इतक्यांत तिचा पुत्र राहुल तिथें दुडदुडत आला. इतके लोक ज्या भाग्यशाली पुरुषाच्या पायीं लागत होते तो पुरुष आपला पिता आहे, हें त्या अजाण मुलाला माहीत नव्हतें. राहुलहि तें विलोभनीय दृश्य पाहात आईजवळ उभा राहिला. इतक्यांत यशोधरेनें त्याला हांक मारली आणि सांगितलें, “ बाळा, तो वीस सहस्र श्रमणांनीं परावृत्त देदीप्यमान पुरुष तुझा पिता आहे. तूं त्याच्याकडे जा आणि ‘ माझें पितृधन मला दे ’ असें सांग. ” यशोधरेच्या मनांत असें सांगण्यांत काय हेतु होता कुणास ठाऊक, पण घडलें तें मात्र विपरीत !

यशोधरेच्या सांगण्याप्रमाणें राहुल गौतमाकडे गेला. गौतमानें त्याला विहारांत नेऊन बौद्धधर्माची दीक्षा दिली. आधींच पतिवियोगानें खचून गेलेल्या यशोधरेच्या मनावर पुत्रवियोगाचा आणखी एक दारुण आघात झाला.

ऐन तारुण्यांत पतीनें त्याग केला तरी पुत्राकडे पाहून तिनें आपलें मन कसेंबसें सांवरलें होतें. आतां तो पुत्रहि तिच्यापासून बापासारखाच कायमचा दूर झाला होता. यशोधरेच्या दुःखाचा आतां कडेलोट झाला होता.

आपला पतिच आपल्या दुःखाला सर्वस्वीं कारणीभूत आहे, याची यशोधरेला तीव्र जाणीव होत असली तरी ती पतीला विसरूं शकत नव्हती. त्याच्या भेटीला ती स्वतः गेली नाहीं; पण पतीचें एकदां दर्शन व्हावें, त्याच्याशीं बोलावें, त्याच्या पायांवर आपलें मस्तक ठेवावें असें सारखें तिला वाटत होतें. पण ती मानिनी आपण होऊन पतीकडे जायला तयार नव्हती. तिला वाटत होतें, ' आपण निर्दोष आहों, पतीनें आपल्याला न सांगतां आपला त्याग केला, स्वतः संन्यासी होऊन आणि आतां आपल्या लाडक्या पुत्रालाहि संन्यास दिला तोहि तिला एका शब्दानेंहि न विचारतां न सवरतां ! त्यानें हा फार मोठा अन्याय केला आहे. तरीसुद्धां मी एक-निष्ठपणें राहिलें आहें. माझ्या पतीनें घेतलेलें व्रत मीहि आचरीत आलें आहें. पत्नीधर्मापासून मी यत्किंचितहि ढळलेली नाहीं. तेव्हां माझ्या पतीनें स्वतः होऊन माझ्याकडे आलें पाहिजे. मी निर्दोष आहें हें त्याला समजून त्यानें आलें पाहिजे. ' तो तसा आला तर ती स्वतःला धन्य समजणार होती. यांतच तिच्या दुःखाची परिसमाप्ति होती, तिच्या व्यक्तित्वाचा गौरव होता आणि गौतमाची थोरवी होती.

आपल्या पत्नीची अनुपस्थिति गौतमाला तीव्रतेनें जाणवली. तिच्या खडतर तपश्चर्येबद्दल बऱ्याच गोष्टी त्याच्या कानांवर आल्या होत्या. आपल्या पत्नीची थोरवी त्याला समजली होती. आपण तिच्या बाबतींत केलेला अन्याय, तिला झालेलें दुःख त्याला जाणवलें होतें. गौतमानें साऱ्या गोष्टींचा विचार केला आणि आपल्या कृतीचें थोडें तरी परिमार्जन व्हावें म्हणून तो पत्नीच्या भेटीला निघाला.

राजवाड्यांत प्रवेश करतांना आपल्या बरोबरच्या भिक्षूंना त्यानें बाहेर ठेवलें आणि गौतम एकटा आपल्या पत्नीच्या महालाकडे, यशोधरा जिथें होती तिथें, आला. एके काळीं जो उंबरठा ओलांडतांना त्याच्या मनांत ध्येय आणि प्रेम यांचें द्वंद्व झालें होतें, जो उंबरठा ओलांडणें मोहाच्या आधीन होणें ठरलें असतें, तोच उंबरठा आज वासनांवर विजय मिळून परतलेला गौतम ओलांडीत होता. त्यानें उंबरठ्याच्या आंत पाऊल टाकलें. यशोधरेला चाहूल लागली. तिनें वर पाहिलें—तों गौतम तिच्या पुढ्यांत उभे. तिचें एक स्वप्न साकार झालें होतें. तिची मनीषा सफल झाली होती.

इतःपर संसारांत राहणें यशोधरेला शक्य नव्हतें. पतिबरोबर पुत्रहि निघून गेला होता. यशोधरेचें मन संपूर्णपणें विरक्त झालें. तिनें पतीच्या आणि पुत्राच्या पावलावर पाऊल टाकलें. तीहि भिक्षुणी झाली.

ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29293 दि: 
क्रमांक ... नों: दि:
ग्रंथालय
दा. क्र.
REFBK-0008943